७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. ०४ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०९९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# बारामतीत काँग्रेसने आपले मोठे मन दाखवावे

## सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार न देण्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन

**मुंबई (दै. संध्या)**



अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच महायुतीच्या वतीने सुनेत्रा पवार या उमेदवार असणार आहेत. त्यांच्या विरोधात उमेदवार देण्याचा प्रश्नच येत नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी जाहिर केले आहे. मात्र, सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार देण्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे. या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे नेते मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसच्या नेत्यांना उमेदवार न देण्याची विनंती केली आहे.

या संदर्भात माध्यमांशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसच्या नेत्यांना अजित दादा यांचा दीर्घ काळ सहवास लाभला आहे. काँग्रेस असो की, कोणत्याही पक्षाचा माणूस त्यांच्याकडे गेला तरी अजित पवार त्याचं काम करत होते. त्या अजित पवारांचीच ही सीट आहे. काँग्रेस सोबत अजित पवार यांचा अनेक वर्षांचा सहवास राहिला आहे. आयुष्यातील 75 टक्के राजकारण अजित पवार यांनी काँग्रेसच्या नेत्यांच्या सहवासात घालवले आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांना माझी मागणी आहे की, त्यांनी ही सीट बिनविरोध करावे. राहुरी मध्ये त्यांची लढण्याची इच्छा असेल, तर त्यांनी लढावे. त्यांचा तो अधिकार आहे. त्या ठिकाणी आम्हीही लढायला तयार आहोत. मात्र, बारामती मध्ये आमच्या वहिनी सुनेत्रा पवार यांची निवडणूक आहे. ती सर्वांनीच बिनविरोध करावी, अशी आमची मागणी असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय समाज पक्ष आणि वंचित बहुजन आघाडी यांचा देखील काँग्रेसला बारामतीमध्ये पाठिंबा असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या पक्षाच्या नेत्यांना देखील आम्ही हीच विनंती करत आहे. अजित पवार यांचा या सर्वांनाही सहवास राहिला आहे. अजित पवारांची आठवण अजूनही आपल्या सोबत आहेत. त्यांना जाऊन अजून वर्ष देखील झाले नाही. त्यामुळे किमान या निवडणुकीच्या माध्यमातून तरी काँग्रेसने आपले मोठे मन दाखवावे, असे आवाहन बावनकुळे यांनी केले आहे.

राष्ट्रवादीच्या दोन्ही पक्षाच्या विलिनीकरण संदर्भातला निर्णय हा सुनेत्रा पवार यांचाच असेल. त्या त्यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आहेत. त्यामुळे विलिनीकरण संदर्भातला त्यांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल. त्यामुळे या संदर्भात काही बोलण्यास बावनकुळे यांनी नकार दिला आहे.

# संजय राऊत शिवसेना ठाकरे गट फोडण्याच्या तयारीत

**जळगाव (दै. संध्या)**



शिवसेना ठाकरे गटाचे नेते व खासदार संजय राऊत यांच्या विधानाची सध्या चर्चा सुरू आहे. जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांत पाटील पुढच्या विधानसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची साथ सोडून भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढवतील, असा दावा राऊत यांनी केला आहे. त्यांच्या या विधानावर आता आमदार चंद्रकांत पाटील यांनी खळबळजनक भाष्य केले आहे. संजय राऊत भविष्यात ठाकरे गट फोडणार असल्याचा दावा पाटील यांनी केला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार चंद्रकांत पाटील संजय राऊत यांच्यावर टीका करताना म्हणाले, शिवसेना पक्षाचे जे तुकडे झाले आहेत, ते संजय राऊत यांच्यामुळे झाले आहेत. एकसंघ शिवसेनेचे तुकडे करण्यास संजय राऊत हेच कारणीभूत आहेत, संजय राऊत मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. संजय राऊत जळगावमध्ये लग्नाला येतात आणि राजकीय गप्पा मारतात. आम्ही शिवसेनेत किती निष्ठावंत आहोत हे तुम्हाला सांगण्याची गरज नाही, अशी टीका पाटील यांनी केली आहे. तसेच एकनाथ शिंदे यांना सोडण्याचा कोणताही विचार मी करू शकत नाही, असे स्पष्टीकरणही यावेळी बोलताना चंद्रकांत पाटील यांनी दिले आहे. पुढे ते म्हणाले, जेव्हा आम्ही असे कुठलेही काम करू तेव्हा थेट घरी बसू. संजय राऊत शिवसेनेचा ठाकरे गट फोडून एक नवा गट स्थापन करून उरलेली शिवसेना फोडण्याच्या तयारीत आहेत. ठाकरे गटात राऊत हे मोठी उठाव करणार आहेत. ते नवीन गट स्थापन करण्याच्या तयारीत आहेत, असा खळबळजनक दावाही पाटलांनी केला आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

# युद्ध आणखी पेटलं; इराणच्या सर्वात मोठ्या ब्रिजवर हल्ला

**मुंबई (दै. संध्या)**



आखाती देशात अमेरिका इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध आणखी पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. आताच वेळ आहे, इराणनं तडजोड करावी अन्यथा त्यांच्याकडे काहीच शिल्लक राहणार नाही अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली होती. त्यानंतर या दोन्ही देशात तणाव वाढला. ट्रम्प यांच्या धमकीला इराणचे राष्ट्रपती मसूद पझेश्कियन यांनी प्रत्युत्तर दिले. इराण अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्याचा सामना करण्यासाठी पूर्ण तयार आहे. आम्ही पूर्ण क्षमता वापरू. इराण मागे हटणार नाही असं त्यांनी स्पष्ट सांगितले.

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केलाय की, अमेरिका इस्रायलने इराणमधील सर्वात मोठा उंच पूल नष्ट केला आहे. इराणला पाषाण युगात पाठवण्याच्या धमकीनंतर अमेरिकेने काही तासांत हा हल्ला केला. स्थानिक अधिकाऱ्यांच्या मते, अलबोर्ज परिसरातील हा बी-१ ब्रिजवर मोठा हल्ला झाला. त्यात प्रचंड नुकसान झाले आहे. या हल्ल्यात कमीत कमी ८ लोक मारले गेलेत तर ९५ लोक जखमी झालेत अशी माहिती दिली. सातत्याने होणारे हल्ले पाहता आखाती प्रदेशातील तणाव शांत होण्याऐवजी आणखी चिघळण्यासाठी शक्यता वर्तवली जात आहे. अमेरिका इस्रायलने इराणवरील हल्ले वाढवले आहेत. तेहरानमधील १०० वर्ष जुन्या मेडिकल रिसर्च सेंटरवर टार्गेट हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यानंतर इराणनेही इशारा दिला आहे. हे युद्ध आता तोपर्यंत सुरू राहील जोपर्यंत शत्रूंची नाचक्की आणि गुडघे टेकत नाही. इराणने अमेरिकेला संभाव्य जमिनीवरील कारवाईवरूनही सुनावले आहे. इराणने अबूधाबीतील गॅस फॅसिलिटीवरही हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. इराणचा हा हल्ला हवेतच रोखल्याची अबूधाबीतील अधिकाऱ्यांनी माहिती दिली. मात्र मलब्यामुळे गॅस फॅसिलिटीत नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले.

# घराबाहेर पडण्याचा सल्ला देऊन राऊतांनी ठाकरेंचे कान टोचले

## *पक्षप्रमुखाची निर्भत्सना केल्याची भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांची टीका*

**मुंबई (दै. संध्या)**



जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या संजय राऊत यांनी तीन वर्षांनी लोकसभा निवडणूक असल्याने खासदारकीचे उमेदवार आतापासून ठरवत संघटनेची बांधणी केली पाहिजे, असा सल्ला पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना दिला आहे. घराबाहेर न पडणाऱ्या उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना राऊत यांनी घरचा आहेर दिला आहे. राऊत यांनी एकप्रकारे पक्षनेतृत्वाची निर्भत्सनाच केल्याची बोचरी टीका भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शुक्रवारी केली. उद्धव ठाकरेंना असा सल्ला देण्याची संजय राऊत यांची पहिलीच वेळ नाही. याआधीही त्यांनी शरद पवार हे या वयातही राज्यात फिरायला तयार असल्याचे ट्विट करत उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला होता. आताच्या त्यांच्या सल्ल्यामुळे उबाठा गटात असलेली दुफळी चव्हाट्यावर आल्याचे श्री. बन म्हणाले.

महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांनी एकत्रित बसून निर्णय घेतला पाहिजे असे संजय राऊत म्हणत आहेत. मात्र, काँग्रेस पक्ष परस्पर राहुरी आणि बारामतीचे उमेदवार जाहीर करते यावरून त्यांचा समन्वय दिसून आला आहे. महाविकास आघाडीच्या पार ठिकऱ्या उडाल्या आहेत. तिन्ही पक्षांची तोंडे तीन दिशेला आहेत. मीठ उबाठाचे खायचे आणि प्रवक्तेगिरी शरद पवार यांची करायची हा संजय राऊत यांचा धंदा सुरु असल्याची टीका श्री. बन यांनी केली. अवकाळी पावसाबद्दल बोलताना संजय राऊत यांच्या तोंडून आधी शेतकऱ्यांप्रती सरकार संवेदनशील असल्याचे खरे वाक्य आले. नंतर सारवासारव करत ते सरकार असंवेदनशील असल्याचे म्हणाले. महाविकास आघाडीचे सरकार असंवेदनशील होते. बांधावर गेलेल्या उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांना 25 हजार देऊ, 50 हजार देऊ अशी आश्वासने दिली. प्रत्यक्षात दमडीही दिली नाही असे श्री. बन यांनी नमूद केले.

आताच्या अवकाळी पावसात प्रामुख्याने नुकसान झालेल्या केळीबागांचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश सरकारने दिले. राज्यात कोणतीही निवडणूक नसताना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करत दोन लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने केल्याचे श्री. बन यांनी निदर्शनास आणले.

संकटमोचक हे रस्त्यावर उतरतात, बांधावर जातात. उद्धव ठाकरे जळगावात येऊन शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करणार आहेत का? आदित्य ठाकरे मराठवाड्याच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांचे सांत्वन करणार आहेत का असे सवाल करीत श्री. बन यांनी मागच्यावेळी नुकसानीची पाहणी करण्यासाठी गेलेले संजय राऊत मर्सिडीजमध्ये बसून काजू बदाम खात बसले होते याची आठवण करून दिली.

## ढिंग-टांग




## ब्रेकिंग न्यूज

### तटकरे आणि गर्जे यांच्यात खडाजंगी!

मुंबई (दै. संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पक्षाध्यक्ष पद स्वीकारल्यानंतर निवडणूक आयोगाला पत्र पाठवले होते. या पत्रात सुनील तटकरे तसेच प्रफुल्ल पटेल यांच्या नावासमोर त्यांच्या पदांचा उल्लेख करण्यात आला नव्हता. त्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून त्यात आता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असलेले सुनील तटकरे यांनी कोषाध्यक्ष शिवाजीराव गर्जे यांना खडेबोल सुनावले असल्याची माहिती समोर आली आहे. सुनेत्रा पवारांनी निवडणूक आयोगाला 10 मार्च रोजी पत्र पाठवले होते. या पत्रात सुनेत्रा पवार यांच्या नावासमोर अध्यक्षा, तर शिवाजीराव गर्जे यांच्या नावासमोर खजिनदार असा उल्लेख होता. मात्र पक्षातील ज्येष्ठ नेते सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या नावासमोर पदांचा उल्लेख करण्यात आला नव्हता. तसेच हे पत्र शिवाजीराव गर्जे यांनीच तयार केल्याचे कळल्यानंतर सुनील तटकरे यांनी त्यांना झापल्याची चर्चा आहे. आमदार शिवाजीराव गर्जे हे पवार कुटुंबाचे विश्वासू मानले जातात. निवडणूक आयोगाला पाठवण्यात आलेले पत्र हे त्यांनीच तयार केल्याचे समजते.

**दै. संध्या अँकर** १३५व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक संपन्न

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरी करूया : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (दै. संध्या)**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनी आणि संविधानाने देशाला प्रगतीची दिशा मिळाली आहे. त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे हे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त होणारा कार्यक्रम दरवर्षी अधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत असून, यावर्षीही विविध विभागांच्या समन्वयातून तो अधिक भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरा करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल, २०२६ रोजीच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, माजी आमदार प्रकाश गजभिये, मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, भन्ते डॉ. राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यामागील उद्देश केवळ औपचारिकता नसून त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे असा आहे.

डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानांपैकी एक असून, त्यातील समावेशकतेच्या तत्त्वामुळे भारत विकसित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे. समाजाला मिळणाऱ्या संधी, हक्क आणि प्रगती यामागे कोणाचे योगदान आहे, हे नव्या पिढीला समजणे आवश्यक आहे. त्यामुळे जयंती सोहळा हा केवळ उत्सव न राहता विचारांचा प्रसार करणारा पर्व ठरतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि.१४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या जयंती उत्सवासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमीवर येतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर चैत्यभूमी परिसरात अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायी आणि नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची सर्वंकष व्यवस्था करण्यात यावी. उष्णतेपासून संरक्षण मिळावे यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारण्यात यावेत. प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध ठेवावी. तसेच, दादर आणि परिसरातील वाहतूक सुरळीत राहावी यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य नियोजन करून नियंत्रण ठेवावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले.

नागरिकांना मार्गदर्शन होण्यासाठी विविध ठिकाणी सूचना फलक लावावेत. बेस्ट प्रशासनाने दादर रेल्वे स्थानक ते चैत्यभूमी दरम्यान पुरेशा प्रमाणात बससेवा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून नागरिकांची ये-जा अधिक सुलभ होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती देशासह जगभर मोठ्या प्रमाणावर साजरी होत असल्याचा उल्लेख करत, हा सोहळा अधिक उत्तम पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# स्मार्ट सिटी पुणे आता वॉटर किंगडम

## अजून किती विकास हवा? विजय वडेट्टीवार यांचा उपरोधिक टोला

**पुणे (दै. संध्या)**



पुण्यात गुरुवारी अर्धा तास तुफान पाऊस झाला. यामुळे शहरातील अनेक सखल भागांत कंबरेपर्यंत पाणी साचले. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सत्ताधारी भाजपवर निशाणा साधत 'स्मार्ट सिटी पुणे आता वॉटर किंगडम' झाल्याचा टोला हाणला. पुण्यात 2 एप्रिल रोजी 130 वर्षांनंतरचा विक्रमी पाऊस झाला. यापूर्वी 1896 साली एका दिवसात 51.1 मिलिमीटर पाऊस झाला होता. त्यानंतर काल गुरुवारी एकाच दिवसात 65 मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद झाली. वादळी वाऱ्यासह झालेल्या या मुसळधार पावसाचा अनेकांना फटका बसला. शहरातील गंगाधाम चौकातील एक मोठी होर्डिंग पावसामुळे कोसळली. पण सुदैवाने कुणालाही दुखापत झाली नाही. पण यामुळे रस्ते वाहतूक मंदावली. दुसरीकडे, अन्य एका ठिकाणी झाड कोसळून 1 महिला दगावली. या घटनेत 2 जण बालंबाल बचावले. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सत्ताधारी भाजपवर निशाणा साधला आहे. विजय वडेट्टीवार या प्रकरणी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, पुणेकरांनी भाजपला अगदी भरभरून दिलं. 6 आमदार, 119 नगरसेवक, 1 खासदार, भाजपाचे एक केंद्रीय मंत्री, राज्यातील एक कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री या पुणे शहरात राहतात. असं असताना काल अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसात हे शहर अक्षरशः बुडालं. स्मार्ट सिटी पुणे आता वॉटर किंगडमकडे वाटचाल करत आहे. इतरवेळी क्रेडिट घेण्यासाठी पुढे येणारे पुण्याचे स्वयंघोषित शिल्पकार यांनाच याचे श्रेय दिले पाहिजे. पुणेकरांना फुकटात वॉटर सफारी मिळाली.. अजून किती विकास पुणेकरांना हवा आहे? असा प्रश्न वडेट्टीवारांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, स्वतःला पुण्याचे शिल्पकार म्हणवणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपण पुण्यातील कालचे चित्र पाहिले की नाही? स्मार्ट सिटी होणार होती, मेट्रो सिटी असे स्वप्न दाखवण्यापेक्षा दररोजच्या सांडपाण्याचे आणि कचऱ्याचे प्रश्न जर सरकारला सोडवता येणार नसतील आणि दर पावसाळ्यामध्ये पुण्यातील रस्ते, नाले,गल्ल्या तुडुंब भरणार असतील त्यात दरवर्षी लोकांचे मालमत्तेचे नुकसान होणार असेल तर आपले सरकार नेमके काय करते?

## संपादकीय

# बांधावरती मिटवा वाद...

शेतीचे किरकोळ वाद मिटवण्यासाठी सुरू केलेला 'पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर' हा उपक्रम नवा 'लातूर पॅटर्न' म्हणून ओळखला जाण्याची गरज आहे. भारतातील ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्येला उपजीविकेचे साधन शेती पुरविते. मराठवाड्यातील तर सर्वच जिल्हे शेतीप्रधान. एके काळी एकेका कुटुंबाकडे मोठ्या प्रमाणात शेती असायची. तेव्हा एकत्र कुटुंबपद्धती होती. आता सगळीकडे मोठे बदल झाले. मोठ्या शेतीत वाटे झाले, क्षेत्र कमी झाल्यामुळे उत्पन्नातही घट आली.

शेतातील बांध, सामायिक विहिरीवरून पाणी घेणे, पायवाट, पाणंद रस्ते, वहिवाटीचा रस्ता आदी कारणांवरून शेतीशी निगडित छोटे-मोठे वाद होत असतात. काही वेळा अगदी किरकोळ स्वरूपाचा हा प्रश्न असतो. पण कुठे भाऊबंदकी, कुठे अहंकार कुठे राजकारण अशा विविध कारणांनी हे वाद वर्षानुवर्षे सुरू राहतात. त्यातून कुणाचा फायदा होत नाहीच; पण नुकसान मात्र निश्चित होते. शेतीतील किरकोळ वाद मिटावेत, शेताच्या दोन शेजाऱ्यांमधील परस्परसंबंध चांगले व्हावेत, या उद्देशाने लातूरचे पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांनी 'पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर' हा अभिनव उपक्रम सुरू केला. हा उपक्रम राज्यासाठी निश्चित आदर्श ठरणार आहे. तांबे लातुरात रुजू होऊन दहा महिन्यांचा कालावधी लोटला. लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उपाययोजनांचे नियोजन करताना जिल्ह्यातील गुन्ह्यांचे विश्लेषण त्यांनी केले. लातूर जिल्ह्यातील पोलिस ठाण्यात आलेल्या अर्जांपैकी बहुतांश अर्ज हे शेतीशी निगडित वादाचे आहेत, हे त्यांच्या लक्षात आले. शेती बांधाचे वाद, पाण्यावरून वाद, रस्त्यावरून वाद असे त्यांचे स्वरूप होते. त्यात मूळ मालकी, हद्द, बांधावरून दावे प्रतिदावे, शेतरस्ता, वहिवाट आणि पाण्याचा वाद अशी पाच प्रमुख प्रकारांची वर्गवारी त्यांनी केली. याबाबतच्या वादांची प्रकरणे पोलिसांपर्यंत पोचतात. पोलिसांकडे आलेल्या तक्रारी खऱ्या की खोट्या? सांगणाऱ्यांपैकी नेमके कुणाचे खरे? असे प्रश्न उपस्थित होत होते. शेतीविषयक वाद मिटविण्यासाठी या सर्व मुद्द्यांचा अभ्यास करून अमोल तांबे यांनी एक कार्यक्रम हाती घेतला... 'पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर'. या कार्यक्रमाच्या अंतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांतर्गत कृती कार्यक्रम निश्चित करण्यात आला. ज्या गावातून शेतीच्या वादाची तक्रार आली आहे तिथे संबंधित पोलिस ठाण्याचे ठाणेदार, तलाठी आणि पोलिस पाटील यांना थेट बांधावर पाठविणे सुरू केले. शेती मोजणीपासून रस्ता, पाणी असा कुठलाही वाद असेल तिथे सर्वांसमक्ष मोजणी करून तक्रारदार, ज्याच्याविरुद्ध तक्रार केली आहे तो पक्ष, सरपंच वा गावातील महत्त्वाची मंडळी एकत्र येऊन जागेवरच तंटा मिटविण्यासाठी पुढाकार घेणे सुरू झाले. पोलिस अधिकारी, कर्मचारी वाद सोडविण्यासाठी आले आहेत हे पाहून गावकरी, तक्रारदार आणि अन्य मंडळीही सहकार्यासाठी पुढे आली. त्यांच्या मध्यस्थीचा अनेक ठिकाणी तत्काळ सकारात्मक फायदा झाला. मागच्या तीन आठवड्यांत शेतीविषयक किरकोळ स्वरूपाचे अनेक वाद पोलिसांनी बांधावरच मिटवले. आपसातील वाद, किरकोळ इगो पोलिसांच्या पुढाकाराने मिटत असल्याचे यातून दिसते आहे. लातूर जिल्ह्यातील अशा प्रकरणांची माहिती घेऊन अडीच महिन्यांची योजना आखण्यात आली आहे. हा उपक्रम ३०मेपर्यंत राबविला जाणार आहे. पहिल्या तीन आठवड्यातील यश पाहता लातूर जिल्ह्याचा हा पथदर्शी प्रकल्प राज्यात फायदेशीर ठरणार आहे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे, शेतीचे वाद मिटवण्यासाठी गेलेल्या पोलिसांना गावातील अन्य अडचणीदेखील लगेच कळून येत आहेत. त्यातून गैरप्रकारांना आळा घालता जात आहे. लोकांचा पोलिस प्रशासनावर विश्वास वाढत आहे. हा उपक्रम यशस्वीपणे राबविल्यानंतर पुढे ग्रामसुरक्षा दल बनविण्याचा तांबे यांच्या विचाराधीन आहे. 'पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर' उपक्रम राज्यभर राबविला तर पोलिस प्रशासनाचा हा नवा 'लातूर पॅटर्न' राज्यासाठी उपयुक्त ठरेल. शेतीविषयक तंटे सोडविण्यासाठी प्रशासनाला लागणारा वेळ, श्रम व आर्थिक बचतही होईल. त्यामुळे याचा राज्यव्यापी विचार व्हायला हवा.

## संस्कृत सुभाषित

अभ्यासेन कटुद्रव्यं भवत्यभिमतं मुने । अन्यस्मै
रोचते निम्बमन्यस्मै मधु रोपते ।।

अर्थ : हे ऋषीवर्या, अभ्यासाने कडू द्रव्यसुद्धा आवडीचे होते. सतत सेवन केल्याने कडुनिम्बसुद्धा आवडू लागतो.

## गुरु वचन

### दुसऱ्यांचे उपकार विसरू नका

इसापनीतीतील एक छान गोष्ट आहे. एकदा एका जंगलामध्ये एक लांडगा राहत होता. तो अत्यंत खादाड आणि दुष्ट होता. त्याला एकदा खूप जोऱ्याची भूक लागली, त्याने जंगलातले अनेक प्राणी मारून खाल्ले. पण इथेच तो अडकला. एका प्राण्याला मारल्यानंतर त्याला खाताना त्याच्या घशात त्या प्राण्याचे हाड अडकले.

त्याने ते हाड काढायचा खूप प्रयत्न केला, परंतु त्याला यश मिळाले नाही. त्याच्या त्या प्रयत्नांनंतर त्याला खूप त्रास सुरू झाला. त्याला नेमके काय करावे हेच समजत नव्हते. त्याने सुरुवातीला भुरपुर पाणी पिले, परंतु त्याला यश मिळाले नाही. मग त्याने आपल्या इतर मित्रांना आपल्या घशातले हाड काढण्यास सांगितले. परंतु त्याच्या साऱ्या मित्रांनी त्याच्याकडे पाठ फिरवली.

शेवटी त्याला त्याच्या डोक्यावरून एक बगळा उडत जाताना दिसला. त्याने त्या बगळ्याला आपली व्यथा सांगितली. तो म्हणाला बगळ्या तू तुझ्या त्या लांब चोचीने जर माझ्या घशात अडकलेले हे हाड काढलेस तर मी तुला बक्षीस देईन, तुझे ते उपकार मी कधीही विसरणार नाही.

बगळ्याला त्याची दया आली. त्याने लांडग्याला मदत करण्याचे ठरवले. तो त्या लांडग्या जवळ आला आणि त्याने त्या लांडग्याच्या घशात आपली चोच घालून आपल्या चोचीने ते अडकलेले हाड काढले. यानंतर त्या बगळ्याने त्याला आपले बक्षीस मागितले, परंतु त्या धूर्त लांडग्याने त्या बगळ्याला चकमा देत तो तेथून फरार झाला.

यानंतर काही दिवसांनंतर पुन्हा एकदा त्या लांडग्याच्या घशात हाडाचा एक तुकडा अडकला, त्याला पुन्हा बगळा दिसला, परंतु बगळ्याने यावेळेस त्याला मुळीच मदत केली नाही कारण यापूर्वी त्याच्यावर केलेल्या उपकारांना तो लांडगा विसरला होता. म्हणून लक्षात ठेवा कधीही दुसऱ्यांनी केलेल्या उपकारांना विसरू नका.

## उपदेशकथा

### साधुचा धर्म

रामकृष्ण परमहंस यांची ही गोष्ट. रामकृष्ण परमहंस हे एके सकाळी नदीत स्नानाला गेले होते. स्नान करून सूर्याला अर्घ्य देण्यासाठी त्यांनी ओंजळत पाणी घेतले तेवढ्यातच त्या नदीत बुडत असणारा एक विंचू त्या पाण्यातून त्यांच्या ओंजळीत आलेला त्यांना दिसला. ओंजळीतील पाणी ओघळून गेल्याबरोबर त्या विंचवाने रामकृष्णांच्या हातांना दंश केला. लगेचच त्यांनी वेदनेने हात झटकला आणि विंचू नदीत पडून बुडायला लागला. त्याला बुडताना पाहून रामकृष्णांनी पुन्हा एकदा त्याला ओंजळीत घेतले आणि पुन्हा विंचवाने त्यांना दंश केला. पुन्हा त्यांनी वेदनेने हात झटकला. विंचू पाण्यात पडला. पुन्हा एकदा रामकृष्णांनी त्याला वाचविले. हे सारे पाहणारा एक माणूस त्यांना म्हणाला, महाराज, जो विंचू तुम्हाला वारंवार दंश करतो, त्याचा जीव तुम्ही का वाचवू पाहता? मरु दे ना त्याला पाण्यात बुडून! हे ऐकून रामकृष्ण उत्तरले, दंश करणे हा विंचवाचा धर्म आहे तर विंचवाचा जीव वाचविणे हा माझा धर्म आहे.

कथा उपदेश : परोपकार हाच साधुचा धर्म असतो. जीव घेणाऱ्याचा जीव वाचविणे हाच तो धर्म होय.

## पंचांग

| पंचांग | योग:हर्षण १४:१६:३६ |
|---|---|
| ४ एप्रिल २०२६ | करण:गर १०:०९:१८ |
| शनिवार | करण:वणिज २३:०१:५१ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मीन |
| चैत्र शके संवत्– १९४८ | चन्द्र:तुला |
| संवत्सर –पराभवनाम | हिजरी सन् – १४४५ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शव्वाल |
| मास– चैत्र | तारीख – १५ |
| ऋतु– सौर वसंत | विशेष |
| कृष्ण पक्ष | श्री श्रीधरस्वामी |
| तिथि:द्वितीया १०:०९:१८ | पुण्यतिथी |
| नक्षत्र:स्वाती २१:३५:१४ | शुभ दिवस |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 9 | 1 | | | 7 | |
| 9 | | 1 | | | 5 | | 4 | |
| | 7 | | | 5 | | | | 2 |
| 7 | | 9 | | 2 | | 3 | 8 | |
| 5 | | 6 | | | | 4 | | 7 |
| | 2 | 4 | | 6 | | 1 | | 9 |
| 1 | | | | 8 | | | 6 | |
| 6 | | 7 | | | | 8 | | 5 |
| | 9 | | | 3 | 6 | 7 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 8 | 6 | 1 | 5 | 9 | 7 |
| 9 | 1 | 5 | 7 | 3 | 4 | 8 | 6 | 2 |
| 6 | 8 | 7 | 2 | 9 | 5 | 1 | 3 | 4 |
| 1 | 4 | 9 | 5 | 2 | 6 | 7 | 8 | 3 |
| 7 | 5 | 2 | 9 | 8 | 3 | 6 | 4 | 1 |
| 3 | 6 | 8 | 1 | 4 | 7 | 9 | 2 | 5 |
| 4 | 9 | 1 | 6 | 7 | 2 | 3 | 5 | 8 |
| 8 | 7 | 3 | 4 | 5 | 9 | 2 | 1 | 6 |
| 5 | 2 | 6 | 3 | 1 | 8 | 4 | 7 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९७८ – शांततेचा 'नोबेल पुरस्कार' मिळालेल्या मार्टिन ल्यूथर किंग यांचा अर्ल रे या गोऱ्या अमेरिकीने गोळ्या घालून खून केला.
- १९७९ – झुल्फीकार अली भुट्टो यांना फासावर चढविण्यात आले.
- २००६ – मध्य अमेरिकेत आलेल्या मौसमी वादळात २७ जण ठार झाले.
- २००७ – पाकिस्तानच्या दक्षिण वजीरिस्तान भागात हिंसाचारात ६० विदेशी दहशतवादी ठार झाले.
- २००८ – दक्षिण आफ्रिकेच्या हारुन लॉरगेट यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) नवे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून निवड झाली.

### राष्ट्रीय

- १९२४ – महात्मा गांधींनी 'यंग इंडिया' व 'नवजीवन' या वृत्तपत्रांचे संपादन स्वत–कडे घेतले.

### जन्म

- १८८९ – हिंदीतील प्रसिद्ध कवी, नाटककार व पत्रकार माखनलाल चतुर्वेदी यांचा जन्म.
- १८९६ – लाईफचे संपादक आणि नाटककार रॉबर्ट अेमेट शेरवूड यांचा जन्म. त्यांना चार वेळा 'पुलित्झर' पारितोषिक मिळाले.
- १९०४ – सुप्रसिद्ध गायक–अभिनेते कुंदनलाल सैगल यांचा जन्म.

### निधन

- १९४० – चार्लस फ्रीअर अँड्र्यूज ऊर्फ दीनबंधू यांचे निधन.
- १९६३ – बहुभाषा कोविद आणि इतिहासकार राहुल सांकृत्यायन यांचे निधन.
- १९९६ – अभ्यासक आणि मराठी साहित्यिक आनंद साधले यांचे निधन.
- २००६ – दिवंगत शाहबानोंचे पती मोहम्मद अहमद खां यांचे निधन.

## : SMS :

MG university standard of questioning
A boy weighs 50kg, he throw a ball weighing 100gm up to a height of 60m at a velocity of 60m/s.
What the boy's fathers name?!!!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३.९ | २२.३ |
| अहमदनगर | ३३.३ | २२.४ |
| अकोला | ३७.७ | २४.४ |
| अमरावती | ३७.४ | २४.७ |
| बीड | ३९.७ | २४.८ |
| भंडारा | ३७.१ | २५ |
| बुलढाणा | ३३.७ | १८.८ |
| चंद्रपूर | ४०.९ | २४.९ |
| चेन्नई | ३८.१ | २५.२ |
| नवी दिल्ली | ३४.१ | २०.३ |
| धुळे | ३८.७ | २४.५ |
| गोंदिया | ३६.७ | २४.६ |
| जळगाव | ३७.८ | २३.३ |
| कोल्हापूर | ३४.६ | २३.८ |
| लातूर | ३५.७ | २४ |
| मुंबई | ३४.६ | २६.२ |
| नागपूर | ३६.९ | २४.९ |
| नांदेड | ३७.४ | २४.७ |
| नंदूरबार | ३५.२ | २१ |
| नाशिक | ३४.८ | २२.७ |
| पुणे | ३१.७ | २२.१ |
| पंढरपूर | ३७ | २४.३ |
| सातारा | ३४.४ | २३.३ |
| सांगली | ३६ | २३.७ |
| सोलापूर | ३७.५ | २५.४ |
| वर्धा | ३९.२ | २४.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** देवाणघेवाण, कर्ज यांची चिंता सतावत राहील. वैयक्तिक बाबतीत कोणाशीही चर्चा करु नका.

**तुळ :** व्यवसायातील रेंगाळलेली कामे मार्गी लावता येतील. वरिष्ठांकडून आपल्या कामाची प्रशंसा होईल.

**वृषभ :** अचानक कुणीतरी धोका देण्याचा संभव आहे. कोणाकडूनही आपले काम होईल अशी अपेक्षा बाळगू नका. स्वत:चे काम स्वत:च करावे.

**वृश्चिक :** नवोदीत कलाकारांना आपल्या क्षेत्रात सुसंधी लाभतील. प्रतिष्ठीत व्यक्तींच्या ओळखीतून लाभ होतील.

**मिथुन :** तात्पुरत्या स्वरुपात काही अडचणी निर्माण होऊ शकतात. नवीन आर्थिक गुंतवणूक करताना विचारपूर्वक करावी. चांगल्या व्यक्तींची भेट होईल.

**धनु :** कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नका. आपल्या मताशी ठाम राहीलात तर परिस्थितीशी जुळवून घेणे सोपे जाईल. धाडसी निर्णय विचारपूर्वक घ्यावेत.

**कर्क :** राजकीय क्षेत्रात आपले वर्चस्व वाढेल. चांगल्या विचारांमुळे आपले जीवन सुकर होण्यास मदत होईल.

**मकर :** आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल. विवाहेच्छुक तरुणांचे परिचयोत्तर विवाह ठरतील. घरात मंगलकार्याची नांदी होईल.


**सिंह :** आपण हाती घेतलेले प्रत्येक काम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सहाय्यकांची मदत मोलाची ठरणार आहे. नवीन व्यावसायिक करार घडतील.

**कुंभ :** नवीन व्यावसायिक करार घडतील. प्रगतीपथावर मार्गक्रमण करण्यासाठी सतत नवीन योजनांची आखणी कराल. भांडवल उभे कराल.

**कन्या :** प्रगतीपथावर मार्गक्रमण करण्यासाठी सतत नवीन योजनांची आखणी कराल. आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल.

**मीन :** व्यवसायीक उद्योगातील कामानिमित्त कर्ज प्रकरण रखडले असेल तर ते मार्गी लागेल. प्रिय व्यक्तींच्या भेटी होतील. तरुणांच्या कौशल्याला चांगला वाव मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०७



### आडवे शब्द

१. दडपण, वजन
३. आकाशाला भेदणारा आवाज इत्यादी
८. गंध
१०. भ्रम
१२. बर्फाचा पर्वत
१४. गरजू
१६. रानात जाणारा रस्ता
१८. वाकबगार, निपुण
२०. साप
२१. गाढव
२२. जिवंत
२४. घरातील मोठी माणसे
२६. मोठी बहीण
२७. शेंगेवरील आवरण, फोलपट
२९. खुंटी, मेख
३०. पंख
३२. उत्तराधिकारी
३३. जन्म–मृत्यू
३५. फोडातील द्रव
३७. मधली बहीण
३८. रुचीहीन, बेचव
४०. उथळ मोठी वाटी
४१. राजवाडा
४२. प्रत्युत्तर
४३. इक्षुदंड, यापासून साखर बनवितात
४४. शूर
४५. खण पण कापड नव्हे
४६. श्रेष्ठ पुरुष
४९. कजाग स्त्री, आदिमाया
५१. सोन्याचे शिवकालीन नाणे
५३. हात
५५. तिरळा, काणा
५६अ. सत्त्व
५७. प्रताप, विक्रम
५९. प्रेत
६१. कलावंत
६३. मोठी जाड सतरंजी
६४. झाड
६५. चटकन रागावणारा
६६. काळ्या पाठीचे हरिण
६९. मुंबईतील एक उपनगर
७२. व्यवस्था, उद्योग
७३. समानता
७४. पेन–पन्सिलीची पेटी
७७. परिस्थिती
७८. झाडाची त्वचा
७९. पुरणाची आमटी, कोल्हापुरी मिसळीतील रस्सा
८०. पाटलाचे काम

### उभे शब्द

२. पूर्ण बहिरा
३. चुकीचे (हिंदी)
४. क्षमा, दुर्लक्ष
५. चीर, फट
६. नवऱ्याचा भाऊ
७. मित्र, सोबती
९. एकूणात प्रमाण
१०. किंमत
११. पाचवीला पुजली जाणारी
१३. कापड विणण्याचे साधन
१५. पशू
१७. आकाश
१९. मूळ आधार
२१. कृष्णसखी
२२. मिठाई तयार करणारा
२३. तपासणी करणारा
२५. बारीकसारीक
२६. तारणारा
२८. काढलेली सुट्टी
३०. अत्युच्च लष्करी बहुमान
३१. पांढरे केस लपवणारा
३४. अभिनेता
३६. खुंट, आंचळ
३७. संमोहित करणारे सौंदर्य
३९. मदतनीस
४७. मोजकेपणा, मितता
४८. सरस्वतीच्या जवळील वाद्य
४९. भ्रमर, भुंगा
५०. माणुसकी
५२. नकला करणारा
५४. धपाटा
५६. न्यूनता
५६ब. प्रभात
५८. सज्जनगडचे संत
६०. मऊ पदार्थाचा आघात
६२. दही घुसळण्याचे साधन
६६. फळावरील साल
६८. रायगडावरील एक कडा
७०. धमकी
७१. पवित्र, शुद्ध
७४. मनाचा ओढा
७५. घट्ट, धन
७६. शिल्लक राहिलेली रक्कम

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. १०६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.समाचार घेणे ५.अज ७.पावसाळा १०.धड ११.चर १२.हितोपदेश १३.सम १४.मैना १५.सामना १६.जनगणना १८.कात्री १९.भू २०.तमासगीर २३.खास २५.जमा २७.ततपप २९.नावडतीचे मीठ अळणी ३३.रसा ३५.तन ३६.ळण ३८.राजवट ३९.नादावणे ४१.परवा ४३.अमर ४५.रन ४६.नकुल सहदेव ४९.मध ५०.जन्म ५१.रास ५३.वडा ५४.वळ ५५.हारजीत ५७.काजवा ५८.श्रावण ५९.वपन ६१.लव ६५.टरकणे ६७.हारा ६९.साखर ७१.कळक ७३.माळ ७४.जनगणमन ७६.समई ७८.पापा ७९.रसरशीत ८२.समरस ८३.मदन ८४.परीक्षा

उभे उत्तर : १.सधन २.माड ३.रचना ४.घेर ५.अतोनात ६.जप ७.पाश ८.सामान ९.सामनावीर १२.हिम १३.सण १४.मैत्री १६.जरतर १७.गडप १८.कासव २१.मावळण २२.गीत २३.खानावळ २४.युती २५.जमीनदार २६.माठ २८.पसारा ३०.डमडम ३१.चेतना ३२.अळणे ३४.नवरदेव ३७.बारकुडा ४०.वनराज ४१.पनवती ४२.वाल ४३.अधर ४४.रजतपट ४७.सजावट ४८.वळणदार ४९.महान ५२.सवाल ५६.जीव ६०.नरमाई ६२.वर्तन ६३.वहाण ६४.घळ ६६.कळ ६८.रामरक्षा ७०.खलाशी ७१.कळस ७२.कसर ७४.जपान ७५.नस ७७.मस ७८.पाद ८०.रस्सी ८१.तळे

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गुड फ्रायडे निमित्त पवित्र नाम देवालय चर्चमध्ये बलिदानाचा विशेष संदेश

पुणे (दैनिक संध्या) : गुड फ्रायडे हा ख्रिस्ती धर्मियांचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र सण आहे. जो येशू ख्रिस्ताचा बलिदानाची आठवण म्हणून पाळला जातो. गुरुवार पेठ पंच हौद येथील पवित्र नाम देवालय चर्चमध्ये गुड फ्रायडे निमित्त दुपारी विशेष प्रार्थना सभेचे आयोजन केला गेला. यावेळी यावेळी ख्रिस्ती बांधवांनी येशूचे स्मरण करून मौन पाळण्यात आला. बिशप आशिष पांडेला यांचा प्रभू येशू बलिदानाचा विशेष संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी चर्चचे सचिव मनोज येवलेकर, खजिनदार प्रशांत सूर्यवंशी, सदस्य गिरीश पाठक, दिलीप शेकटकर, विकास उमपती, रोजमेरी साठे, विजया इंदुरकर, प्राजक्ता परोळे, कौमुदी येवलेकर, गौरव अमोलिक, जेकब अमोलिक, विल्सन चक्रे, पवन भोंगे, सुबोध वाघमारे, महेश केणी, जॉन वाघमारे, मोहन मुदलिया, संदीप गायकवाड, नरेश माने, जॉन्सन पिल्ले, राजेंद्र पवार, निखिल टाकळकर, नितीन मोहिते, दिनेश शर्मा, सचिन वाकोडे, तेजस हंगरे, विशाल पटोले, संकेत सूर्यवंशी, फ्रँकिंन डिसूजा, राजेश पारोल, आदी यावेळी उपस्थित होते.



### आरती अंकलीकर यांच्या सुरांनी रंगली संगीतमय मैफल

■ श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३६ वा पुण्यतिथी उत्सव

पुणे (दैनिक संध्या) : श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३६ वा पुण्यतिथी उत्सव' भक्तिभावात साजरा करण्यात येत असून, या निमित्ताने ज्येष्ठ गायिका आरती अंकलीकर यांच्या सुरेल गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाची सुरुवात राग केदारमधील 'राम नाम जपत' या रचनेने झाली. त्यानंतर संत रामदास यांचे "तानें स्वर रंगवावा.. मग तो रघुनाथ ध्यावा.." हे पद सादर करून भक्तिरसाची उधळण करण्यात आली. पुढे संत मीराबाई यांचे 'म्हारे घर आओ जी' हे भजन सादर करत श्रोत्यांना निस्सिम भक्तीच्या भावविश्वात नेले. यासोबतच 'अवघा रंग एक झाला' या अभंगाच्या सुरेल सादरीकरणाने श्रोते शास्त्रीय संगीताच्या दुनियेत रममाण केले. दरम्यान, गुरुवार दि. २ एप्रिल रोजी दुपारी १ नंतर मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, या उत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

### रा. स्व. संघात व्यक्तीला नाही तर विचारांना महत्त्व : विराट हिंदू संमेलनाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : भीती वाटावे असे वातावरण देशात असताना २०१४ साली स्वातंत्र्याची कल्पना देशात आली. हिंदूंची दैन्यवस्था करण्याचे काम हिंदूंनीच केले आहे. म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हिंदू समाजाचे संघटन करण्याचे ठरवले.घराणे शाही मोडून काढण्याचे काम संघाने केले आहे. कर्तृत्ववान कार्यकर्ते संघात निर्माण झाले आणि ते संघाने समाजासाठी दिले. फक्त देशभक्त या देशाचे प्रश्न सोडवू शकतील आणि देशभक्त फक्त संघातच घडू शकतो. संघात व्यक्तीला नाही तर विचारांना महत्त्व आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकारणी सदस्य हेमंत हरहरे यांनी व्यक्त केले. सकल हिंदू समाज मानाजी नगर नऱ्हे परिसर तर्फे विराट हिंदू संमेलनाचे आयोजन प्रा. डॉ. सुधाकर राव जाधवर कॅम्पस येथे करण्यात आले होते.

# सोनालिका ट्रॅक्टर्सची १,८०,५०४ ट्रॅक्टर्सच्या विक्रमी विक्रीची नोंद

■ शेतकऱ्यांचा कंपनीवरील वाढता विश्वास, तसेच विविध प्रदेशांमधील शेतीविषयक विविध गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनीची सज्जता आणि बळकट समन्वय हेसुद्धा या अचंबित करणाऱ्या कामगिरीतून अधोरेखित झाले आहेत

पुणे (दै. संध्या)

भारताचा क्रमांक १ चा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या 'सोनालिका ट्रॅक्टर्स'ने तिच्या ३० व्या गौरवशाली वर्षात एका ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये १,८०,५०४ ट्रॅक्टर्स एवढ्या आजवरच्या सर्वोच्च विक्रीची नोंद केली आहे. कंपनीचे शिस्तबद्ध कार्यान्वयन, 'शेतकरी-प्रथम' दृष्टिकोन आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत व 'हेवी-ड्यूटी' ट्रॅक्टर्स पुरवण्यावर असलेला सततचा भर यांचे प्रतिबिंब दर्शविणारी अशी ही कामगिरी आहे. शेतकऱ्यांचा कंपनीवरील वाढता विश्वास, तसेच विविध प्रदेशांमधील शेतीविषयक विविध गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनीची सज्जता आणि बळकट समन्वय हेसुद्धा या अचंबित करणाऱ्या कामगिरीतून अधोरेखित झाले आहेत.

एकीकडे जागतिक वातावरण आव्हानांनी भरलेले असतानाच्या काळातही सोनालिकाने आपल्या 'जगातील क्रमांक १ च्या ट्रॅक्टर निर्मिती प्रकल्पा'मध्ये केंद्रित




कार्यान्वयन,उत्पादनातील नावीन्य आणि उत्कृष्ट उत्पादन प्रक्रियेच्या माध्यमातून जबरदस्त गती कायम राखली आहे. आर्थिक वर्ष २०२६ मधील कंपनी उत्साहवर्धक उत्पादनांचे लाँचिंग करणार आहे. त्या बळावर सोनालिका तिची 'संशोधन आणि विकास' क्षमता अधिक बळकट करण्यास सज्ज झाली आहे. त्यातून भविष्यातील विकासाला चालना देण्यासाठी अत्याधुनिक उत्पादने उपलब्ध करून देण्यात येतील. इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, "आमच्या महत्त्वपूर्ण अशा या ३० व्या वर्षात आमचा 'जीतने का दम' खऱ्या अर्थाने साकार झाला आहे, आम्ही वितरित केलेला प्रत्येक ट्रॅक्टर शेतकऱ्यांना सक्षम करण्याची आमची जिद्द आणि समाधान न मानण्याच्या आमच्या वृत्तीचे प्रतीक आहे, कारण उत्कृष्टतेच्या शोधात आम्ही नेहमीच उत्सुक असतो. आमच्या 'शेतकरी प्रथम' या तत्त्वज्ञानाशी एकनिष्ठ राहून आणि आर्थिक वर्ष २०२६ मधील दमदार उत्पादन लाँचच्या जोरावर आम्ही आमच्या संशोधन आणि विकास क्षमता अधिक मजबूत करत आहोत. त्यातून आमच्या शेतकरी समुदायाला आणखी प्रगत उपाययोजना देण्याचा आमचा मानस आहे. आमचे डीलर भागीदार, विविध विभागांतील टीम्स आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आमच्या शेतकऱ्यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. त्यांच्या विश्वासावरच आमचे सर्व कार्य आधारलेले आहे. शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी असलेल्या अढळ कटिबद्धतेसह आम्ही नवनवीन सीमा ओलांडत राहू. कारण ही तर फक्त सुरुवात आहे आणि 'आता थांबायचे नाही'. सर्वोत्तम काळ अद्याप यायचा आहे."

## मोठ्या भांडवलापेक्षा मोठ्या विचारांची गरज : रोहिणी कल्याणी

पुणे (दै. संध्या)

विकसित भारत ही केवळ सरकारची नाही, तर आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. तरुणांना व्यवसायात आणण्यासाठी लहान-मोठ्या उद्योजकांनी त्यांना मदत करणे आवश्यक आहे. स्टार्टअप उभारण्यासाठी तांत्रिक ज्ञान, योग्य दृष्टीकोन आणि मेहनत करण्याची तयारी असणे गरजेचे आहेच. पण त्याबरोबर मोठ्या भांडवलाची नव्हे, तर मोठ्या विचारांची आवश्यकता असते. आपण कोणत्या परिस्थितीतून आलो यापेक्षा आपण कोणत्या दिशेने चाललो आहोत आणि किती जिद्दीने प्रयत्न करीत आहोत, हे अधिक महत्त्वाचे आहे, असे मत कल्याणी फोर्ज च्या कार्यकारी अध्यक्षा रोहिणी कल्याणी यांनी व्यक्त केले. वीरशैव लिंगायत ग्लोबल ऑर्गनायझेशन आयोजित लिंगायत बिजनेस नेटवर्क, एक्स्पो २०२६ या प्रदर्शनाचे आयोजन गणेश कला क्रीडा मंच येथे करण्यात आले होते. यावेळी www.vlgo.org या वेबसाईट चे अनावरण करण्यात आले. तसेच प्रदर्शनात तरुण व्यावसायिक व विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. चित्रपट दिग्दर्शक शिवराज वायचळ, मराठवाडा युवा मंचचे अध्यक्ष सत्यजीत चौधरी आणि रॉयल टुरिझमच्या राजश्री खडके देशमाने यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उद्योजक रवि डोल्ली, महेश मुद्दा व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रदर्शनाचे उद्घाटन दि. विश्वेश्वर सहकारी बँक लि. पुणे अध्यक्ष अनिल गाडवे, उद्योजक अजय मुंगडे यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनात १२० स्टॉल चा समावेश होता. प्रदर्शनात व्यावसायिक, शैक्षणिक आणि शेतीविषयक, तर खाद्य पदार्थांचे आयोजन करण्यात आले होते.

## परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी उपमहापौर उतरले रस्त्यावर

पुणे (दै. संध्या)

अवकाळी पावसाने सलग दोन दिवस पुणेकरांना झोडपले असून एप्रिल महिन्यातील सर्वाधिक पावसाचा तब्बल 130 वर्षांचा विक्रम या दोन दिवसाच्या पावसाने मोडून काढला आहे. यामुळे घडलेल्या झाडपडीसारख्या, रस्त्यावर पाणी साचणे आणि ड्रेनेज तुंबण्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. रस्त्यांना ओढ्या नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले. अनेक नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरले. कचराकुंड्यांमध्ये पाणी जाऊन कचऱ्याचा चिखल झाला. ही निर्माण झालेली परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी खुद्द उपमहापौर परशुराम वाडेकर रस्त्यावर उतरले.

कमी कालावधीमध्ये जोरदार वाऱ्यांसह शहरात वादळी पाऊस झाला. तुफान पावसामुळे अनेक ठिकाणी ड्रेनेज तुंबण्याचे प्रकार घडले. या विषयीच्या अनेक तक्रारी उपमहापौर परशुराम वाडेकर



यांच्याकडे येवू लागल्या. या परिस्थितीत वेगाने कामे करून परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी स्वतः रस्त्यावर उभे राहून महापालिकेचा उद्यान विभाग, सफाई कर्मचारी यांना सूचना देवून यांच्यामार्फत वेगाने कामे मार्गी लावली. या विषयी माहिती देताना वाडेकर म्हणाले, या पावसामुळे ज्या ठिकाणी ड्रेनेज तुंबळे, रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी साठणे असे प्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहेत. तसेच घरात पाणी शिरण्याचे प्रकार घडले अशा सर्व ठिकाणांची नोंद घेण्यात आली असून या पुढील पावसाळ्यात किंवा अवकाळी पावसाच्या वेळी नागरिकांना पुन्हा या त्रासाला सामोरे जावे लागू नये यासाठी लवकरात लवकर प्रभावी उपाययोजना करण्यात येतील, असे वाडेकर यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले, बोपोडी परिसरातील पठाण चाळ बोपोडी 53, 54 हायवे जवळील वसाहत, बोपोडी सर्वे क्रमांक 26 येथील तक्रारी काढून घेण्यात आल्या आहेत. विविध ठिकाणाचा कचरा काढून घेण्यात आला आहे. त्यामध्ये मटन मार्केट, दूध भट्टी, मारुती मंदिर परिसर व औंध रोड परिसरात असे अनेक ठिकाणी मधील कचरा काढून स्वच्छ करून घेण्यात आले असेही वाडेकर यांनी सांगितले.

## माऊलींच्या प्रत्येक ओवीत संवादातून सुसंवाद साधण्याची ताकद

आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे यांचे प्रतिपादन ; श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने प्रवचन

पुणे (दै. संध्या)

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी भक्तीला वैश्विक रूप देत सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले. ज्ञानेश्वरी हा श्रोतृसंवाद, अमृतानुभव आत्मसंवाद, चांगदेव पासष्टी शिष्यसंवाद आणि हरिपाठ लोकसंवाद असल्याचे सांगत माऊलींच्या प्रत्येक ओवीत संवादातून सुसंवाद साधण्याची ताकद आहे, असे प्रतिपादन आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे यांनी केले. श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३६ वा पुण्यतिथी उत्सव' साजरा करण्यात येत आहे. या उत्सवात



भावार्थ देखणे यांचे प्रवचन झाले. भावार्थ देखणे म्हणाले, कवित्व, रसिकत्व आणि परतत्त्वाचा स्पर्श असलेली ज्ञानेश्वरी ही केवळ ग्रंथ नसून संवादातून सुसंवाद घडवणारी जीवनदृष्टी आहे. तार्किक दृष्ट्या, अभ्यास दृष्ट्या ज्ञानेश्वरी वाचली तर त्याचे फळ मिळेल पण त्याहीपेक्षा भाव ठेवून ज्ञानेश्वरी वाचाल तेव्हा त्याचे फळ अधिक मिळणार आहे. सर्वसामान्यांपर्यंत आध्यात्मिक विचार पोहोचवण्यासाठी आवश्यक त्या सर्व माध्यमांचा वापर ज्ञानेश्वर माऊलींनी केल्यामुळेच त्यांचे साहित्य आजही तितकेच प्रभावी ठरते, ते पुढे म्हणाले, ज्ञानेश्वरी ही भगवद्गीतेवरील टीका असली, तरी ती केवळ गीतेचे भाष्य नाही, तर जीवनाचे व्यापक तत्त्वज्ञान आहे. विज्ञानावर सत्य बुद्धी ठेवणे यालाच माऊली अज्ञान म्हणतात. आपल्याला ज्ञानामध्ये जायचे आहे विज्ञान बाजूला करायचा नाही. परंतु विज्ञान कुठे, ज्ञान कुठले ही नीर-क्षीर बुद्धी आपल्याला जोपर्यंत येत नाही तोपर्यंत माऊलींची दृष्टी आपल्याला समजणार नाही.

## कसबा पेठेत श्री काळ भैरवनाथ उत्सवानिमित्त बगाड

पुणे (दै. संध्या)

पारंपरिक वाद्य ढोल-ताशा व बँड च्या निनादात पालखी खांद्यावर घेताच फुले आणि गुलालाची झालेली मुक्त उधळण आणि श्री काळ भैरवनाथ महाराज की जय.. चा अखंड जयघोष अशा भक्तीमय वातावरणात कसबा पेठेतील पुण्याचे प्राचीन ग्रामदैवत व क्षेत्रपाल श्री काळभैरवनाथ महाराजांची पालखी आणि बगाड मोठया उत्साहात साजरे झाले. शेकडो वर्षांची परंपरा जपत साजरा झालेला बगाड उत्सव पाहण्याकरिता पुणेकरांनी मोठी गर्दी केली होती. श्री बहिरोबा देव ट्रस्ट, श्री काळ भैरवनाथ मंदिर तर्फे कसबा पेठेतील पुण्याचे प्राचीन ग्रामदैवत व क्षेत्रपाल श्री काळ भैरवनाथ महाराजांच्या उत्सवांतर्गत पालखी व बगाड उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री ९ वाजता मुख्य बगाड सोहळा मोठया उत्साहात पारंपरिक पद्धतीने पार पडला. त्यानंतर महापूजा व आरतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यापूर्वी सकाळी ६.३० वाजता लघुरुद्र व आरती, दुपारी श्री भैरव अष्टोत्तरी नामावली व माध्यान्ह आरती झाली. मंदिराचे व्यवस्थापन आजपर्यंत लडकत घराण्याकडे असून वर्षभरात विविध उत्सव केले जातात. मंदिराला फुलांची आकर्षक आरास व विद्युत रोषणाई करण्यात आली. श्री काळभैरवनाथ हे पुण्याचे जागृत ग्रामदैवत असून भैरवनाथ मंदिराचे गर्भगृह आणि मध्यगृह हेमाडपंथी बांधणीचे आहे.

## अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी कृषी मंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर

"नुकसानाचे पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत दिली जाईल"

पुणे (दै. संध्या)

"राज्यात वादळी वारा व गारांच्या पावसामुळे (अवकाळी) १ लाख २२ हजार हेक्टरहून ( ३ लाख ५ हजार एकर) अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यभरातील नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन तातडीने पंचनामे पूर्ण करुन बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल" अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज भोर तालुक्यातील वडगाव डाळ येथे भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी गावातील नुकसान झालेल्या आंब्याच्या बागांचे तसेच विविध शेती पिकांचे प्रत्यक्ष पाहणी केली. अवकाळी पावसामुळे आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. अनेक ठिकाणी फळगळ, झाडांचे नुकसान तसेच उभ्या पिकांवर परिणाम झाल्याचे दिसून आले. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.



मार्च महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यभर मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः नाशिक (२९,८१२ हेक्टर), अहिल्यानगर (२३,६३३ हेक्टर), जळगाव (२२,३६१ हेक्टर), धुळे (१४,८३२ हेक्टर), बुलढाणा (८,५०७ हेक्टर) व छत्रपती संभाजीनगर (८,४४५ हेक्टर) आदी जिल्ह्यातील लाखो हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली आहेत.

राज्यात केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, कलिंगड, भाजीपाला, डाळिंब, कांदा, संत्रा, द्राक्ष आदी पिकांचे तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक ठिकाणी कांदा कुजला असून पपईची रोपेही खराब झाली आहेत. शेतात पाणी साचल्याने उभी पिके आडवी झाली असून मजुरी व खतांचा खर्च वाया गेला आहे.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, "अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे वेळेत पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार हे शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, अशी सर्व बांधवांना विनंती आहे."



## खड्डे चुकवताना ट्रक-स्कुटी अपघात

ओतूर (दै. संध्या)

ओतूर ता.जुन्नर गावच्या हद्दीत अहिल्यानगर कल्याण महामार्गावरील खड्डे चुकवता मोनिका चौकात ट्रक व स्कुटीत फसगत होऊन स्कुटी घसरल्याने महिला महामार्गावर पडून ट्रक खाली चिरडली जाऊन जागीच ठार झाली आहे. सदर अपघात शुक्रवारी दुपारी १२ वाजे दरम्यान मोनिका चौकात झाला असून या अपघातात स्नेहल अहिनवे वय.३३ रा.अहिनवेवाडी ता.जुन्नर जि. पुणे ही महिला जागीच ठार झाली आहे. या अपघात बाबात अधिक माहिती अशी कि स्नेहल अहिनवे या त्याचे नातेवाईक दत्तात्रय अहिनवे याच्या स्कुटीवर मागे बसून ओतूर मधुन येत होते. त्याच वेळी अहिल्यानगर कल्याण महामार्गावरून ट्रक माळशेज कडून आळेफाटा बाजूला चालला होता. ओतूर गावच्या हद्दीत मोनिका चौकात ट्रक व स्कुटी मध्ये फसगत झाली आणि स्कुटी घसरून पडुन दत्तात्रय अहिनवे हे किरकोळ जखमी झाले तर स्नेहल अहिनवे यांच्या अंगावरून ट्रक गेल्याने त्या गंभीर जखमी होऊन ठार झाल्या.

## जय गुरु... च्या जयघोषात श्री जंगली महाराजांच्या पादुकांचा पालखी सोहळा

श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणे ; तब्बल १ हजार किलो गव्हाच्या खिरीचा प्रसाद

पुणे (दै. संध्या)

जय गुरु आणि टाळ मृदूंगाचा नादघोष... पारंपरिक वेशातील भाविक अशा भक्तीमय वातावरणात श्री जंगली महाराजांच्या पादुकांचा पालखी सोहळा थाटात काढण्यात आला. शिवाजीनगर गावठाण येथील श्री रोकडोबा मंदिर येथून ही मिरवणूक काढण्यात आली. कपाळी गुलाल-बुक्का लावून पादुकांचे दर्शन घेत भाविक मिरवणुकीत सहभागी झाले. तसेच भाविकांना १००० किलो गव्हाच्या खिरीचा प्रसाद देखील मंदिरात देण्यात आला.

श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणेच्या वतीने 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३६ वा पुण्यतिथी उत्सव' साजरा करण्यात येतो. ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र तांबेकर, उपाध्यक्ष चंद्रकांत शिरोळे, सेक्रेटरी शिरीष लोखंडे यांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्सवाचे नियोजन केले. महाराजांच्या पादुकांची पालखी मिरवणूक श्री रोकडोबा मंदिर, शिवाजीनगर गावठाण येथून शिवाजीनगर गावठाण परिसरात काढण्यात आली. टाळ-मृदुंगांचा गजर




आणि कपाळी गुलाल-बुक्का लावून भाविक मिरवणुकीत मोठया उत्साहाने सहभागी झाले होते. पालखीची मिरवणूक घेऊन भजनकरी पारंपारिक रित्या गेले १३६ वर्ष रोकडोबा मंदिरापासून जंगली महाराज समाधी मंदिरापर्यंत टाळ मृदंगाच्या घोषात मंदिरामध्ये मध्यरात्रीनंतर येतात. मंदिरात तयार केलेला खिरीचा महाप्रसाद हनुमान जयंतीच्या दिवशी दुपारी बारानंतर रात्री नऊ वाजेपर्यंत जवळजवळ चार ते पाच हजार भाविक घेऊन जातात.

मंदिरात तब्बल २३० किलो गूळ, २१० किलो गहू, १० किलो तांदूळ आणि २० किलो ड्रायफ्रुट वापरुन सलग ६ ते ७ तास सुमारे १० ते १२ सेवेकऱ्यांनी १००० किलो गव्हाच्या खिरीचा प्रसाद तयार केला. भव्य कढईमध्ये खीर तयार करतानाचे दृश्य पाहण्याकरिता देखील भाविकांनी मोठी गर्दी केली. खिरीचा प्रसाद हे सन १९६५ पासून उत्सवाचे वैशिष्ट्य आहे. पालखी सोहळा आणि महाराजांची आरती झाल्यानंतर त्याच अग्निने चूल पेटविली जाते. भव्य कढईमध्ये मंदिराच्या मागच्या बाजूस असलेल्या पटांगणात हा प्रसाद केला जातो. मोठया संख्येने भाविक हा प्रसाद ग्रहण करण्याकरिता येतात.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मंथनमध्ये शिवाज्ञा गायकवाड राज्यात प्रथम; 150 पैकी 150 गुण मिळवत मारली बाजी

नीरा (दैनिक संध्या) : पिंपरे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थिनी शिवाज्ञा किरण गायकवाड हिने मंथन सामान्य ज्ञान परीक्षा २०२६ मध्ये १५० पैकी १५० गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या दैदिप्यमान यशामुळे शाळेसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.तर पुरंदर पंचायत समितीच्या सदस्य मोनिका कांबळे यांनी तिच्या घरी जाऊन तिचा सत्कार करत कौतुक केले. दुसरी इयत्तेत शिकणाऱ्या शिवाज्ञाने अतिशय लहान वयात हे यश संपादन करत आपल्या बुद्धिमत्तेची आणि अभ्यासू वृत्तीची प्रचिती दिली आहे. तिच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, ग्रामस्थ आणि पालकवर्गाकडून तिचे कौतुक होत आहे. तिला वर्गशिक्षिका विजया कुंभार तसेच भाऊसो बरकडे माळवदकर पाटील व मुख्याध्यापिका विशाखा मेमाणे यांनी मार्गदर्शन केले. मंथन सामान्य ज्ञान परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण बौद्धिक विकासासाठी घेतली जाणारी एक राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा आहे. या परीक्षेमध्ये सामान्य ज्ञान, चालू घडामोडी, विज्ञान, इतिहास, भूगोल अशा विविध विषयांवरील प्रश्न विचारले जातात. विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता, तर्कशक्ती आणि ज्ञानाचा आवाका वाढवणे हा या परीक्षेचा मुख्य उद्देश असतो. त्यामुळे या परीक्षेला शैक्षणिक क्षेत्रात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान, जिल्हा परिषद शाळा पिंपरे खुर्द ही शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळखली जाते. यंदाच्या मंथन परीक्षेसाठी या शाळेतील एकूण ६२ विद्यार्थी सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले असून, शाळेने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे.

### पिंपळे सौदागरला मिळणार स्वतंत्र पोलीस ठाणे; सुरक्षा कवच होणार भक्कम!



पिंपरी (दैनिक संध्या) : गेल्या काही वर्षांत आयटी हब आणि वेगाने विकसित होणारे नागरी क्षेत्र अशी ओळख निर्माण झालेल्या पिंपळे सौदागर परिसराच्या सुरक्षिततेसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पिंपळे सौदागरसाठी आता स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर होण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, पोलीस आयुक्तालयाने तसा अधिकृत प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला आहे. आमदार श्री. शंकरशेठ जगताप आणि भाजप शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या अथक पाठपुराव्यामुळे पिंपळे सौदागरकरांची ही अनेक वर्षांची मागणी आता पूर्णत्वास येत आहे. पिंपळे सौदागर हे शहर केवळ पिंपरी-चिंचवडच नव्हे, तर राज्यातील एक महत्त्वाचे निवासी आणि व्यावसायिक केंद्र बनले आहे. या भागातील मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या, शाळा आणि वाढती लोकसंख्या पाहता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याची नितांत गरज होती. सध्या या भागाला जवळच्या पोलीस ठाण्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याने पोलिसांना घटनास्थळी पोहोचण्यास विलंब होत असे. ही अडचण लक्षात घेऊन शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी स्थानिक नागरिकांच्या भावना आणि सुरक्षेचा प्रश्न वारंवार प्रशासकीय बैठकीत मांडला होता. आमदार शंकरशेठ जगताप यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून थेट गृह मंत्रालयाकडे हा विषय लावून धरला होता. या दोघांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे पोलीस आयुक्तालयाने केवळ नवीन पोलीस ठाण्यांचाच नाही, तर प्रशासकीय सुलभतेसाठी नवीन 'परिमंडळ ४' चा प्रस्तावही दिला आहे.

### सांगवी सांडस येथे विहिरीत पडलेल्या बिबट्याचा थरारक बचाव

उरुळी कांचन (दैनिक संध्या) : हवेली तालुक्यातील सांगवी सांडस येथे आज पहाटे विहिरीत पडलेल्या बिबट्याला,पुणे वनविभागाने अत्यंत शिताफीने बाहेर काढत त्याचे प्राण वाचवले.या धाडसी व नियोजनबद्ध बचावकार्यामुळे वनविभागाच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. वनपरिक्षेत्र आधिकारी सुरेश वरक यांनी दिलेल्या माहितीनुसार सांगवी सांडस येथील सर्जेराव मानाजी सातव यांच्या शेतातील विहिरीत बिबट्या पडल्याची माहिती वनविभागाला पहाटे पाच वाजता मिळाली. तत्काळ वनसंरक्षक आशिष ठाकरे व उपवनसंरक्षक महादेव मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक यांच्या नेतृत्वाखाली बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले.अत्यंत काळजीपूर्वक व कुशलतेने राबवलेल्या या मोहिमेत बिबट्याला सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात यश आले. यानंतर बिबट्याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी त्याला बावधन येथील वन्यप्राणी उपचार केंद्रात हलविण्यात आले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव विठ्ठलवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे. येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे अशिल धर्मेंद्र मधुकर मंडलीक यांनी सांगितलेवरून जाहिर नोटीस देण्यात येते की,

गाव विठ्ठलवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील खाते क्र. ५०४ वरील जमीन गट नं. २७१ मधील क्षेत्र ४ हे ९७ आर, पो. ख १ हे ५८ आर, आकार ३ रू ६८ पैसे ही मिळकती पैकी १) श्री. आत्माराम किसन घोगरे, २) गुलाब म्हातारबा घोगरे, ३) पुष्पा अशोक घोगरे, ४) प्रविण अशोक घोगरे, ५) सुनिल अशोक घोगरे, ६) अविनाश अशोक घोगरे, ७) सुलोचना सिताराम पुंडे, ८) उल्हास शामराम घोगरे, ९) अमृता रोहन आद्रे, १०) अश्विनी निलेश ठोसर, ११) पुष्पावती उल्हास घोगरे, १२) योगेश उल्हास घोगरे यांचे क्षेत्र ३ हे ०० आर, पो.ख सह ही मिळकत यांचे मालकी ताबेवहिवाटीची मिळकत आहे. सदर उपरोक्त १) श्री. आत्माराम किसन घोगरे, २) गुलाब म्हातारबा घोगरे, ३) पुष्पा अशोक घोगरे, ४) प्रविण अशोक घोगरे, ५) सुनिल अशोक घोगरे, ६) अविनाश अशोक घोगरे, ७) सुलोचना सिताराम पुंडे, ८) उल्हास शामराम घोगरे, ९) अमृता रोहन आद्रे, १०) अश्विनी निलेश ठोसर, ११) पुष्पावती उल्हास घोगरे, १२) योगेश उल्हास घोगरे यांच्या सदरहू मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार आमचे अशिल धर्मेंद्र मधुकर मंडलीक यांच्याबरोबर करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही, बक्षीस, गहान, दान, लिज, पोटगी, चोळी, बांगडी, खरेदी, साठेखत, करार, मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क खरेदी संदर्भात वाद, चतुः सिमाबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंन्दू कायदयाप्रमाणे अथवा प्रचलित पथे प्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरूध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क, हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीव पुर्वक सोडून दिलेले आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कोणाचेही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस
ता.०१/०४/२०२६.

सही/-
श्री. विश्वजीत गोपाळ वर्पे
ॲडव्होकेट
मो.९७३०८२८७२१.
ऑफिस-हिंन्दू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व्यापारी संकुल, दुसरा मजला, गाळा नं.१९, धान्य बाजार पेठ, जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२.


# Airtel जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी टेलिकॉम कंपनी

नवी दिल्ली (दै. संध्या) :




Bharti Airtel, जगातील ग्राहकसंख्येनुसार दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी टेलिकॉम ऑपरेटर आणि भारतातील अग्रगण्य दूरसंचार सेवा प्रदाता, यांनी आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत ६५० दशलक्ष ग्राहकसंख्या ओलांडली आहे.

GSMA Intelligence च्या माहितीनुसार, Bharti Airtel ही मोबाईल ग्राहकसंख्येनुसार जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर आहे, आणि तिचे कार्य भारत व आफ्रिका या प्रदेशांमध्ये विस्तारलेले आहे.

या महत्त्वपूर्ण टप्प्याबद्दल बोलताना, Gopal Vittal, एक्झिक्युटिव्ह व्हाइस चेअरमन, Bharti Airtel, म्हणाले: "६५० दशलक्ष ग्राहकांचा टप्पा गाठून जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकाची ऑपरेटर होणे ही आमच्यासाठी मोठी जबाबदारी आहे, ज्यामुळे आम्ही दररोज आमच्या ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करतो.

याच कारणामुळे आम्ही अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करतो, ज्यामुळे केवळ कनेक्टिव्हिटीच नव्हे तर सुरक्षित नेटवर्कही प्रदान करता येईल.

आमचे ध्येय स्पष्ट आहे: जसे आम्ही आमची उपस्थिती अधिक मजबूत आणि विस्तृत करतो, तसे आम्ही नवकल्पना, विश्वासार्हता आणि ग्राहक अनुभव यामध्ये नवे मापदंड स्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहू, जेणेकरून प्रत्येक ग्राहक संवाद हा विश्वास निर्माण करण्याची आणि मूल्य देण्याची संधी ठरेल."

मोबाईल ग्राहकसंख्येनुसार दुसऱ्या क्रमांकाची टेलिकॉम ऑपरेटर म्हणून Airtel ची ही कामगिरी त्यांच्या जागतिक स्तरावरील सातत्यपूर्ण प्रगतीचे द्योतक आहे.

कंपनीचे कार्य भारत आणि आफ्रिका या प्रदेशांमध्ये विस्तारलेले असून, त्यांच्या कार्यक्षेत्रातील बाजारपेठांमध्ये वाढत्या डिजिटल सेवा आणि पायाभूत सुविधा क्षमतांच्या पोर्टफोलिओच्या बळावर ते समर्थित आहे:

३६८ दशलक्षाहून अधिक मोबाईल ग्राहकांना सेवा देत, Bharti Airtel ही 5G Plus सेवा सुरू करणारी पहिली कंपनी ठरली असून, या सेवांवर आधारित एकत्रित डिजिटल परिसंस्था उभारण्यात आली आहे, ज्यामध्ये Xstream AirFiber (FWA) आणि एकात्मिक IPTV सेवा यांचा समावेश आहे. Airtel सध्या १३ दशलक्षाहून अधिक घरांना उच्च-गती इंटरनेट सेवा आणि १५ दशलक्षाहून अधिक ग्राहकांना डिजिटल टीव्ही सेवा पुरवत आहे. ही "ग्राहक-केंद्रित" नवकल्पना जगातील पहिल्या नेटवर्क-आधारित AI स्पॅम संरक्षण उपायाने समर्थित आहे.

Airtel Business विभाग एंटरप्राइझ ग्राहकांसाठी अत्यावश्यक (mission-critical) उपाय प्रदान करतो. यामध्ये Airtel IQ, सायबरसुरक्षा, SD-WAN, क्लाउड, मॅनेज्ड सर्व्हिसेस आणि IoT यांसह सुरक्षित कनेक्टिव्हिटीचा समावेश आहे. या सेवा ४,००,००० किमीहून अधिक सबसी फायबर नेटवर्क आणि Nxtra चे पर्यावरणपूरक डेटा सेंटर्स यांच्या बळावर चालतात, जे देशातील वाढत्या AI आणि डिजिटल वर्कलोड्सना शाश्वत पद्धतीने समर्थन देतात.

डिजिटल सेवांचा विस्तार करत, Airtel ने अलीकडेच NBFC (Non-Banking Financial Company) क्षेत्रात प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. Bharti Airtel आपल्या डेटा अंतर्दृष्टीचा वापर करून Airtel ॲपद्वारे वैयक्तिकृत कर्ज आणि वित्तीय उत्पादने प्रदान करणार आहे.

Airtel Africa १४ देशांमध्ये १७९ दशलक्षाहून अधिक ग्राहकांसह एक महत्त्वाची डिजिटल जीवनरेखा प्रदान करते. ही सेवा एकत्रित मोबाईल व्हॉईस, उच्च-गती डेटा आणि आंतरराष्ट्रीय रोमिंग सेवांद्वारे दिली जाते. त्यांच्या प्रादेशिक धोरणाचा मुख्य आधार Airtel Money आहे—५२ दशलक्षाहून अधिक ग्राहक असलेला एक परिवर्तनकारी मोबाईल वित्तीय प्लॅटफॉर्म—जो बँकिंग आणि तत्काळ पेमेंट सुविधा उपलब्ध करून देत, पूर्वी बँकिंग सेवांपासून वंचित असलेल्या लाखो लोकांना आर्थिक समावेशनामध्ये सहभागी करतो.

## सोरतापवाडीत मुरुम वाहतूक करणाऱ्या डंपरखाली तरुणाचा मृत्यू

उरुळीकांचन (दै. संध्या) :

पुणे- सोलापूर महामार्गावरील सोरतापवाडी फाट्याजवळ मुरुम वाहतुक करणाऱ्या हायवा डंपरने दुचाकीस्वार तरुणाला चिरडल्याने मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार (दि.३) रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली आहे.या प्रकरणी उरुळीकांचन पोलिस ठाण्यात हायवा चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

विक्रम दयानंद सूर्यवंशी(वय १९ वर्षे, रा.बोरीभडक,ता.दौंड,जि. पुणे)असे मृत झालेल्या तरुणांचे नाव आहे.तर याप्रकरणी सुनिल जगन्नाथ शिंदे (रा.सोरतापवाडी,ता. हवेली) असे गुन्हा दाखल झालेल्या हायवा चालकाचे नाव आहे.या प्रकरणी कृष्णा दयानंद सुर्यवंशी यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,तरडे येथून मुरुम भरून घेऊन हायवा डंपर सोरतापवाडी फाट्यावरुन पुण्याच्या दिशेने जात असताना डंपर क्र.एमएच१२ ॲक्यु ५७९७ ने डाव्याबाजूने बोरी भडक येथे घरी जेवणासाठी ॲक्टीव्हा एमएच४२ बीझेड ८३५६ वर चाललेल्या विक्रम सुर्यवंशी याला जोरदार धडक बसल्याने तो गाडीखाली जाऊन चिरडला गेला या अपघातात विक्रमच्या डोक्यावरून चाक गेल्याने तो जागीच ठार झाला.

## देशभरात घरगुती एलपीजी विक्री सुरळीत सुरू

नवी दिल्ली (दै. संध्या) :

जागतिक ऊर्जा बाजारावर चालू भौगोलिक-राजकीय परिस्थितीचा परिणाम होत असला, तरी भारतातील एलपीजी पुरवठा स्थिर, पुरेसा आणि सतत निरीक्षणाखाली आहे. घरगुती एलपीजीला सर्वाधिक प्राधान्य दिले जात आहे.

इंडियन ऑइलकडून घरगुती एलपीजीचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. सध्या दररोज सुमारे 28 लाख गॅस सिलिंडर वितरित केले जात आहेत, जे भौगोलिक-राजकीय तणावापूर्वीच्या नेहमीच्या पातळीप्रमाणे आहेत.

ग्राहकांनी गॅस रिफिल बुक करण्यासाठी एसएमएस आणि आयव्हीआरएससारख्या डिजिटल पद्धतींचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या सुमारे 87% बुकिंग डिजिटल माध्यमातून होत आहेत. तसेच सिलिंडर योग्य ग्राहकांपर्यंत पोहोचावा यासाठी डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड (DAC OTP) द्वारे गॅस वितरण केले जात आहे. कॉर्पोरेशन आपल्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर आलेल्या ग्राहकांच्या तक्रारींवर लक्ष देत आहे आणि त्यांना त्वरीत उत्तर देण्यास कटिबद्ध आहे. इंडेनच्या ग्राहकांनी तत्काळ मदतीसाठी indanecareho@indianoil.in या ईमेलवर संपर्क साधावा, असे सांगितले आहे.

काही एलपीजी वितरकांच्या गैरप्रकारांबाबत सोशल मीडिया आणि ग्राहकांच्या तक्रारींमधून माहिती मिळाली आहे. काळा बाजार आणि साठेबाजी टाळण्यासाठी अनेक क्रॉस-फंक्शनल टीम्सना एलपीजी वितरकांकडे अचानक तपासणी करण्यासाठी पाठवले गेले आहे. आतापर्यंत 7,500 पेक्षा जास्त तपासण्या करण्यात आल्या असून, 141 एलपीजी वितरकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे, ज्यात 5 वितरकांना निलंबित करण्यात आले आहे. इंडियन ऑइल आणि इतर तेल विपणन कंपन्या राज्य सरकारांसोबत मिळून गैरप्रकार टाळण्यासाठी आणि साठेबाजी रोखण्यासाठी काम करत आहेत. आतापर्यंत सुमारे 68,000 छापे टाकले गेले, 855 एफआयआर नोंदवल्या गेल्या आणि 48,000 हून अधिक सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. इंडियन ऑइल सर्व इंडेन ग्राहकांना सांगते की देशात एलपीजी पुरवठा पर्याप्त आणि सुरळीत आहे, कुठलाही तुटवडा नाही. ग्राहकांनी एलपीजी वितरकांच्या रांगा लावू नयेत आणि घाईघाईत बुकिंग किंवा सिलिंडर साठवू नयेत. तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये आणि फक्त अधिकृत माहितीवर अवलंबून राहावे. इंडियन ऑइल एलपीजी पुरवठा अखंड ठेवण्यास, वितरणात पारदर्शकता राखण्यास आणि गैरप्रकारांविरुद्ध कडक कारवाई करण्यास पूर्णपणे कटिबद्ध आहे.

## मराठी ZEE5 सादर करत आहे गाजलेली दमदार मराठी फिल्म – रुबाब

नवी दिल्ली (दै. संध्या) :

**शेखर बापू रणखांबे दिग्दर्शित आणि झंकार फिल्म्सच्या सहकार्याने झी स्टुडिओ द्वारे निर्मित या चित्रपटात संभाजी ससाणे आणि शीतल पाटील यांच्या भूमिका असून लवकरच मराठी ZEE5 वर या चित्रपटाचा डिजिटल प्रीमियर होणार**




यंदा वर्षाच्या सुरुवातीला चित्रपटगृहातील प्रदर्शनादरम्यान प्रेक्षकांसमोर झळकल्यानंतर, रुबाब मराठी ZEE5 वरील डिजिटल प्रीमिअरद्वारे व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. रॉमान्स, ड्रामा आणि इमोशन्स यांचे मिश्रण असलेला हा चित्रपट अभिमान, नातेसंबंध आणि आपण कोण आहोत हे ठरवणाऱ्या निवडीमध्ये रुजलेली कथा घेऊन येतो. आपल्या हृदयात, रुबाब ही कलाकृती सूरज आणि वैशालीच्या प्रवासाचे अनुसरण करतो. दोन प्रबळ इच्छाशक्ती असलेल्या व्यक्तींचे जीवन प्रेमाद्वारे एकत्र येते. परंतु परिस्थिती आणि स्वतःच्या भावनेची चाचणी घेतली जाते. त्यांचे नाते जसजसे विकसित होत जाते, तसतसा अभिमान, अहंकार आणि भावना मानवी संबंधांना कसे बळकट आणि आव्हान देऊ शकतात याचा शोध हा चित्रपट घेतो.

प्रणय, ॲक्शन आणि भावनिक क्षणांची सरमिसळ असलेल्या रुबाबमध्ये आत्मसन्मान आणि ओळखीचे महत्त्व प्रतिबिंबित करताना नातेसंबंधांचे चढ-उतार टिपले जातात. संभाजी ससाणे, शीतल पाटील, विशाल शिरतोडे, अभिजीत साकते आणि सिमरन खेडकर यांच्या अभिनयासह या चित्रपटाला त्याच्या आकर्षक कथा आणि अभिनयासाठी चित्रपटगृहांमध्ये प्रशंसा मिळाली. त्याच्या डिजिटल प्रीमिअरद्वारे, रुबाब आता जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. मराठी कथानकास एका व्यापक व्यासपीठावर आणत आहे.

ZEE5 वरील डिजिटल प्रीमिअरबद्दल बोलताना, झी मराठीच्या चीफ चॅनल ऑफिसर आणि मराठी ZEE5 च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. म्हणाल्या, "रुबाब ही नात्यांची खरोखरच एक हृदयस्पर्शी कथा आहे – ही कथा आहे आपल्यासोबत नेहमी असणाऱ्या आत्मसन्मानाची, आपण जपलेल्या प्रेमाची आणि स्व'ला आकार देणाऱ्या भावनांची. सांस्कृतिक पार्श्वभूमीवर आधारित चित्रपटाची कथा आपलीशी आणि घराच्या जवळची वाटते. मराठी चित्रपटाला परिभाषित करणारा प्रामाणिकपणा आणि अस्सलता यात प्रतिबिंबित होते. तसेच मराठी ZEE5 च्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर ही शक्तिशाली कथा उलगडल्याबद्दल आम्हाला अभिमान वाटतो."

दिग्दर्शक शेखर बापू रणखांबे म्हणाले, "रुबाब ही प्रेम, आत्मसन्मान, भावना आणि अहंकाराची टक्कर झाल्यावर लोक करतात त्या निवडीविषयीची कथा आहे. ही एक कथा अतिशय वास्तविक वातावरणातून उत्पन्न झालेली असून प्रेक्षकांना चित्रपटगृहांमध्ये आपलीशी वाटली, हे विशेष आहे. हा चित्रपट आता मराठी ZEE5 वर अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल याचा मला आनंद वाटतो."

संभाजी सासणे पुढे म्हणाले, "सूरजची भूमिका साकारणे हा एक अतिशय मनोरंजक अनुभव होता. कारण त्यात आत्मविश्वास आणि असुरक्षितता दोन्ही आहेत. ही कथा अनेक लोकांच्या भावना प्रतिबिंबित करते आणि मला आनंद आहे की जागतिक स्तरावरील प्रेक्षकांना आता मराठी ZEE5 वर रुबाब पाहण्याची संधी मिळेल. आम्ही त्याची आतुरतेने वाट पाहत आहोत."

शीतल पाटील म्हणाली, "वैशाली ही एक मजबूत आणि स्वतंत्र व्यक्तिरेखा असून तिच्या भूमिकेवर ठाम आहे आणि म्हणूनच मी या भूमिकेकडे आकर्षित झाले. रुबाब नातेसंबंधांमधील भावनिक पदर सुंदरपणे टिपतो. या प्रवासाचा एक भाग असणे खरोखरच विशेष आहे."

रॉमान्स, ड्रामा आणि संबंधित कथाकथनाच्या मिश्रणासह, रुबाब सर्व वयोगटातील प्रेक्षकांसमोर गुंतवणाऱ्या कलाकृतीचे वचन देते.

रुबाब'चा डिजिटल प्रीमियर चुकवू नका, लवकरच केवळ मराठी ZEE5 वर!

## पत्रकार अमोल भोसले यांना 'संघ नायक पुरस्कार - २०२६' प्रदान

लोणी काळभोर (दै. संध्या) :



समाजात प्रामाणिकपणे कार्य करणारी अनेक मंडळी आजही मुख्य प्रवाहातील माध्यमांपासून दूर राहतात. अशा घटकांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी 'संघ नायक'सारख्या संस्था निरपेक्ष भावनेने कार्यरत असल्याचे समाधान वाटते, असे मत पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा माजी आमदार रमेश थोरात यांनी व्यक्त केले. मूक नायक मैत्री संघ आणि दि पिपल्स वेलफेयर अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी सुरू केलेल्या 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाच्या ९९ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि 'संघ नायक न्यूज'च्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष 'संघ नायक गौरव पुरस्कार सोहळा - २०२६' नुकताच पार पडला. या सोहळ्यात पूर्व हवेली तालुक्यातील कोरेगाव मुळ येथील सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेले पत्रकार अमोल बाबासाहेब भोसले यांना 'आदर्श पत्रकार संघ नायक पुरस्कार - २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार माजी आमदार रमेश थोरात यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला आयोजक पत्रकार सदाशिव कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये ज्येष्ठ पत्रकार एम. जी. शेलार, वीर गोविंद गोपाळ महार यांचे वंशज पांडुरंग गायकवाड, पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य दिलीप वाल्हेकर, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष गुलाब चौधरी, तसेच शिवराज साने, आबासाहेब चव्हाण, संदीप बडेकर, बाबासाहेब बेडेकर, संतोष सोनवणे, रोहिदास जाधव आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार स्वीकृतीवेळी अमोल भोसले यांनी हा सन्मान कै. सौ. मिनाताई दादासो कोल्हे यांना समर्पित असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार सदाशिव कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पत्रकार अनिल गायकवाड यांनी केले.

# राजगुरुनगर येथे पीएमआरडीएची अतिक्रमणविरोधी कारवाई

## दुकानदारांचा संताप, एकतर्फी कारवाईचा आरोप

राजगुरुनगर (दै. संध्या) :

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पी.एम.आर.डी.ए.) कडून पुणे–नाशिक महामार्गावरील चांडोली (राजगुरुनगर) येथे गुरुवारी अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. अचानक झालेल्या या कारवाईमुळे परिसरातील दुकानदारांमध्ये एकच खळबळ उडाली. कारवाईदरम्यान पत्र्याच्या शेडमध्ये उभारण्यात आलेली अनधिकृत दुकाने जेसीबी व इतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने हटविण्यात आली. या कारवाईत भाड्याच्या जागेत व्यवसाय करणाऱ्या एका दुकानदाराचे मोठे नुकसान झाल्याने त्यांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. दरम्यान, जागा मालक तसेच श्रमिक ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संतोष डोळस यांनी ही कारवाई एकतर्फी असल्याचा आरोप करत सर्व अतिक्रमणांवर सरसकट कारवाई होणे आवश्यक असल्याचे सांगितले. ही मोहीम पीएमआरडीएच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने तहसीलदार तथा सहाय्यक नियंत्रक रवींद्र रांजणे व तहसीलदार आशा होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिस बंदोबस्त



ठेवण्यात आला होता. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अनधिकृत बांधकामांबाबत राज्य मागास आयोगाकडे तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्या अनुषंगाने संबंधितांना पूर्वसूचना देण्यात आली होती. मात्र, अतिक्रमणे न हटवल्याने ही कारवाई करण्यात आली. पी.एम.आर.डी.ए.च्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही कारवाई पूर्वनियोजित असून कोणाचेही नुकसान करण्याचा हेतू नाही. संबंधितांना यापूर्वी नोटिसा देण्यात आल्या होत्या, तरीही अतिक्रमण कायम राहिल्याने कारवाई अपरिहार्य ठरली.

> "माझ्या विरोधात करण्यात आलेल्या तक्रारीची प्रशासनाने तत्काळ दखल घेत कारवाई केली. मात्र मी केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे प्रशासनाच्या एकतर्फी कारवाईचा मी निषेध करतो."
> — **संतोष डोळस, जिल्हाध्यक्ष, रिपाइं (श्रमिक ब्रिगेड)**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पवना बंद पाईपलाईन प्रकल्पाला गती देण्यासाठी कलाटे यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पवना धरणातून बंद पाईपलाईन प्रकल्पाचे ९०% भूसंपादन पूर्ण झाले असून उर्वरित प्रकल्पपूर्तीसाठी निधी देऊन तातडीने गती देण्याची मागणी नगरसेवक राहुल कलाटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. नगरसेवक राहुल कलाटे यांनी (१ एप्रिल) रोजी मुख्यमंत्र्यांची मुंबईत भेट घेतली. तत्पूर्वी पिंपरी चिंचवड महापालिका सर्वसाधारण सभेत त्यांनी हा विषय अतिशय गांभीर्याने उपस्थित केला होता. पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा पवना थेट बंद पाईपलाईन योजनेसाठीचे ९०% भूसंपादन पूर्ण झाले असून त्यासाठी महापालिका अर्थसंकल्पात १८६ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र एकूण रकमेच्या २५% तरतूद नसेल तर पुन्हा टेंडर निघायला अडचण येऊन प्रकल्प प्रलंबित होईल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ही वस्तुथिती ही कलाटे यांनी महापालिका सर्वसाधारण सभेत मांडली होती. स्थानिक पातळीवर योग्य निर्णय न झाल्यास प्रसंगी मुख्यमंत्र्यांना याबद्दल विनंती करेन असेही ते सभागृहात म्हणाले होते. याच पार्श्वभूमीवर कलाटे यांनी आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असल्याचे समजते. आपल्या पिंपरी चिंचवड शहराला पवना धरणातून रोज सुमारे पाचशे दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. नैसर्गिक प्रवाहाद्वारे रावेत बंधाऱ्यापर्यंत येणारे हे पाणी उपसा करून जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाते. त्यातून शहराला पाणीपुरवठा केला जातो. मात्र या पद्धतीमुळे पाण्याची गळती मोठ्या प्रमाणावर होत असून प्रदूषित पाणी मिक्स होऊन पाण्याच्या गुणवत्तेवरही परिणाम होतोय. पवना थेट बंद पाईपलाईन प्रकल्पामुळे अंदाजे १०० एमएलडी पाण्याची बचत होऊन तेवढे अतिरिक्त पाणी पिण्यासाठी उपलब्ध होऊ शकते. शिवाय सुमारे १५ वर्ष प्रकल्प प्रलंबित राहिल्याने प्रकल्पाचा खर्च वाढत जाऊन ३०० कोटींहून १२५६ कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याची स्थिती आहे. त्यामुळे शासन पातळीवर मुख्यमंत्र्यांनी यात प्राधान्याने लक्ष घालून निधीची तरतूद तातडीने करावी आणि प्रकल्पाला योग्य तो प्रशासकीय हस्तक्षेप करून गती द्यावी अशी मागणी राहुल कलाटे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



### पावसाचा तडाखा; पिंपरी-चिंचवडमध्ये 17 ठिकाणी झाडपडी, अनेक वाहनांचे नुकसान

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरात आज दुपारनंतर झालेल्या मुसळधार पावसासह सोसाट्याच्या वाऱ्यामुळे विविध ठिकाणी आपत्कालीन घटना घडल्या. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षात दुपारी २.१४ ते सायंकाळी ७.२५ या कालावधीत अनेक घटनांची नोंद झाली. या कालावधीत एका ठिकाणी इलेक्ट्रिकल डी.पी.ला आग लागल्याची घटना घडली. तसेच शहरातील विविध भागांत झाडे पडण्याच्या एकूण १७ घटना नोंदविण्यात आल्या. रावेत परिसरात सीमाभिंत कोसळल्याचीही एक घटना समोर आली. सुदैवाने या सर्व घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी किंवा जखमींची नोंद झालेली नाही. मात्र, काही ठिकाणी पार्किंगमध्ये उभी असलेली वाहने झाडाखाली सापडल्याने त्यांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, अग्निशमन दलाने तात्काळ हालचाल करत घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी १० अग्निशमन वाहने, २ रेस्क्यू व्हॅन आणि सुमारे ८० जवान तैनात करण्यात आले होते. रात्री उशिरापर्यंत मदत व बचावकार्य सुरू होते. अचानक बदललेल्या हवामानामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# उपमहापौर शर्मिला बाबर यांच्याकडून इतिहासाचे धडे

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या उपमहापौर कक्षात आज उर्दू माध्यमिक विद्यालय, रुपीनगर येथील विद्यार्थी व शिक्षकांनी स्थानिक इतिहास विषयाच्या अभ्यासासाठी उपमहापौर शर्मिला बाबर यांची भेट घेतली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जिज्ञासेला चालना देण्यासाठी आयोजित या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशासनाची ओळख करून देण्यात आली. या प्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत पिंपरी चिंचवड शहराच्या इतिहासाची माहिती दिली. औद्योगिक विकास, स्थलांतरित लोकसंख्या, तसेच नियोजनबद्ध नागरीकरणामुळे शहराने कशाप्रकारे प्रगती साधली, याचे त्यांनी सोप्या भाषेत विवेचन केले. महानगर पालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध लोकाभिमुख योजना, मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित सेवा यांचीही माहिती विद्यार्थ्यांना दिली.



विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने संवादात सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. शहरातील पायाभूत सुविधा, शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन यासंदर्भात विद्यार्थ्यांनी प्रश्ने विचारली. या संवादामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत जागरूकता निर्माण झाली. यावेळी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी विद्यार्थ्यांना महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील विविध विभागांची रचना, त्यांच्या कार्यपद्धती आणि जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर माहिती दिली. करसंकलन, आरोग्य, बांधकाम परवाने, पाणीपुरवठा, स्वच्छता अशा विविध विभागांमार्फत शहराचा कारभार कसा चालतो, याचे त्यांनी स्पष्टीकरण केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

या भेटीत शाळेच्या शिक्षक समितीचे अध्यक्ष अशफाक शेख, शिक्षक मोहम्मद आतिफ फैजल, शिक्षिका ताहेरा शेख तसेच विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांनीही अशा प्रकारच्या शैक्षणिक भेटी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरत असल्याचे मत व्यक्त केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्थानिक इतिहासासोबतच नागरी प्रशासनाची प्रत्यक्ष ओळख झाली.

## काळेवाडीत रविवारी भव्य महाआरोग्य शिबिर

**पिंपरी (दै. संध्या)**

■ नगरसेवक विनोद नढे यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी दि.५ एप्रिल रोजी काळेवाडीत भव्य "महाआरोग्य शिबिर" आयोजित करण्यात आले आहे. नागरिकांना मोफत व सवलतीच्या दरात आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश असून या शिबिराचे आयोजन नगरसेवक विनोद नढे यांनी केले आहे. हे शिबिर रविवारी दि.०५ एप्रिल रोजी सकाळी १० ते २ या वेळेत नगरसेवक विनोद नढे यांच्या जनसंपर्क कार्यालय, पवना चौक, तळेगाव काळेवाडी येथे पार पडणार आहे. या उपक्रमात SMD मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व YCM (यशवंतराव चव्हाण मेमोरियल) हॉस्पिटल यांचा सहभाग असणार आहे. या शिबिरात डॉक्टर सल्ला, रक्तदाब (BP), BMI, ECG, ब्लड शुगर (Fasting & PP), HbA1c अशा विविध तपासण्या केल्या जाणार आहेत. तसेच रक्त तपासण्यांवर ५० टक्के, औषधांवर २० टक्के व CT Scan, MRI, USG यांवरही २० टक्के सवलत देण्यात येणार आहे. याशिवाय लिपिड प्रोफाइल व व्हिटॅमिन D3 या तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत.

## "लोकसहभाग हीच शहर विकासाची ताकद" – महापौर रवि लांडगे

### निगडीत हजारो नागरिकांच्या उपस्थितीत ऑक्सिजन पार्कचे उद्‌घाटन

**पिंपरी (दै. संध्या)**

"लोकसहभागातून उभे राहणारे उपक्रम हीच शहर विकासाची खरी ताकद आहे, निगडी परिसरातील नागरिक आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त प्रयत्नातून तयार झालेला ऑक्सिजन पार्क हा एक अनोखा आदर्श असा पर्यावरणपूरक उपक्रम आहे असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी निगडी प्राधिकरण येथील ऑक्सिजन पार्कच्या उद्‌घाटन प्रसंगी केले.



निगडी प्राधिकरण येथील सेक्टर २६ मध्ये स्थानिक रहिवासी आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या सहभागातून विकसित करण्यात आलेल्या ऑक्सिजन पार्कचे उद्‌घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले,त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसदस्या शैलजा मोरे, अनुराधा गोरखे, नगरसदस्य अमित गावडे यांच्यासह महापालिका मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, कार्यकारी अभियंता सुनील पवार, दिलीप भोसले, जयकुमार गुजर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, तसेच राजेंद्र बाबर, विजय नाईक, धनंजय शेडबाळे, सुर्यकांत मुथियान व ऑक्सिजन पार्क उभारण्यात सक्रिय सहभाग नोंदविणारे परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, पर्यावरण संवर्धन ही सामूहिक जबाबदारी असून अशा हरित प्रकल्पांमुळे पिंपरी चिंचवड शहर हे अधिक आरोग्यदायी आणि सुंदर बनेल. तसेच शहरातील २०३ उद्यानांपैकी २५ ते ३० उद्यानांमध्ये अशी संकल्पना लोकसहभागातून राबविण्यात येईल, असेही त्यांनी बोलताना सांगितले.

या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तसेच 'माझी वसुंधरा' शपथ घेऊन पर्यावरण संवर्धनाचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## सायबर फसवणूक प्रकरणी तिघांना अटक, बँकॉक – म्यानमार कनेक्शन उघड

**पिंपरी चिंचवड पोलिसांची मोठी कामगिरी**

**पिंपरी (दै. संध्या)**

शेअर मार्केट आणि आयपीओमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली सुमारे सव्वा दोन कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायबर टोळीचा पिंपरी चिंचवड पोलिसांच्या सायबर टीमने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, या प्रकरणाचे धागेदोरे थेट बँकॉक आणि म्यानमारमधील कुप्रसिद्ध सायबर कॉल सेंटर्सपर्यंत पोहोचले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका प्लेसमेंट व इंटर्नशिप देणाऱ्या कंपनीच्या मालकाला शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर भरघोस परताव्याचे आमिष दाखवण्यात आले होते. विविध कारणे सांगत सायबर भामट्यांनी त्यांच्याकडून तब्बल २ कोटी ९ लाख ३० हजार ५३७ रुपये उकळले. परतावा न मिळाल्याने संबंधित व्यक्तीने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तपासादरम्यान सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या एका संशयास्पद खात्याची माहिती समोर आली. हे खाते 'आर्शिल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड' या नावाने नवी मुंबईत उघडण्यात आले होते. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी तुर्भे परिसरातून सुशील भगवान जुवाटकर याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने हे खाते आपल्या साथीदार पंकज राज कपूर आणि निश्चल टंकबीर बरेयली यांच्या सांगण्यावरून उघडल्याची कबुली दिली. पुढील तपासात उघड झाले की, पंकज कपूर आणि निश्चल बरेयली यांनी यापूर्वी बँकॉक व म्यानमारमधील सायबर फसवणूक कॉल सेंटर्समध्ये काम केले होते. त्याच अनुभवाच्या आधारे ते नवी मुंबईत नवीन कॉल सेंटर सुरू करण्याच्या तयारीत होते.



या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून ६ मोबाईल फोन, २ लॅपटॉप, ३ पासपोर्ट, ३ पॉस मशीन, २४ विविध बँक खात्यांचे किट्स, १२ बनावट शिक्के आणि २ हार्डडिस्क असा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान, पोलिसांनी तातडीने कारवाई करत फिर्यादीचे ६२ लाख रुपये विविध बँक खात्यांमध्ये होल्ड करण्यात यश मिळवले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश कातकाडे व त्यांचे पथक करत आहे.

## पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक रस्त्यांवर पाणी साचले

**पिंपरी (दै. संध्या)**

हवामान खात्याने पुणे जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जाहीर केल्यानंतर आज दुपारनंतर शहरात अवकाळी पावसाने हजेरी लावली. मात्र या पावसामुळे प्रशासनाच्या तयारीचा अभाव पुन्हा एकदा समोर आला. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई न झाल्याने शहरातील अनेक भागांत पाणी साचल्याचे चित्र दिसून आले. विशेषतः दापोडी परिसरातील भुयारी मार्गात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. काही ठिकाणी वाहतूक मंदावली तर काही रस्त्यांवर पाणी साचल्याने नागरिकांना पायी चालणेही कठीण झाले. स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाच्या निष्काळजीपणावर नाराजी व्यक्त करण्यात येत असून, दरवर्षी



पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करण्याची मागणी होत आहे. अचानक पडणाऱ्या पावसामुळे शहरातील पायाभूत सुविधांची वास्तविक स्थिती समोर येत असून, तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने नालेसफाई आणि पाणी निचऱ्याची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# महसूलवाढीच्या बळावर शहराला अधिक सक्षम बनवणार : महापौर

**पायाभूत सुविधा, स्वच्छता व सार्वजनिक सेवांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यावर देणार भर**

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहरातील करदात्यांच्या भक्कम सहकार्यामुळे पिंपरी चिंचवड महापालिका विविध विकास प्रकल्प आणि लोकाभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबवत आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये शहरातील नागरिकांनी वेळेत कर भरून आपली जबाबदारी सजगपणे पार पाडली, ही बाब महापालिकेसाठी अत्यंत प्रेरणादायी असून मी सर्व करदात्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. महापालिकेला कराच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग नागरिकांच्या कल्याणासाठी आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी



महापौर रवि लांडगे बोलत होते. या पत्रकार परिषदेस विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, उपआयुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, राजेश आगळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच पत्रकार उपस्थित होते. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मालमत्ता कर, पाणीकर, अग्निशमन सेवा शुल्क, झोपडपट्टी सेवाकर, बांधकाम परवानगी शुल्क, आकाशचिन्ह परवाना शुल्क अशा विविध माध्यमातून महसूल वसुलीसाठी सुयोग्य नियोजन करणाऱ्या महापालिकेच्या विविध विभागाचे विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांचेही महापौर रवि लांडगे यांनी यावेळी अभिनंदन केले. महापौर रवि लांडगे म्हणाले, महापालिकेच्या महसूलवाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, ऑनलाईन कर भरणा, सवलत योजना आणि सुलभ सेवा यांमुळे कर वसुलीत लक्षणीय वाढ झाली आहे. करप्रक्रिया अधिक पारदर्शक, सोयीस्कर आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. भविष्यातही करदात्यांचा विश्वास अधिक दृढ करून महसूलवाढ साध्य करण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षण यांसारख्या अत्यावश्यक सेवांच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. आगामी काळातही नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध विकासकामांना गती दिली जाणार असून, शहराला अधिक सुजलाम-सुफलाम आणि स्मार्ट बनविण्याचा महापालिकेचा ठाम संकल्प असल्याचेही महापौर रवि लांडगे यांनी यावेळी नमूद केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ९६१ कोटींहून अधिक मालमत्ता कर वसूल करत सलग दुसऱ्यांदा साडेनऊशे कोटींचा टप्पा पार केला आहे. शहरातील सुमारे ७ लाख ३२ हजार मालमत्तांपैकी ६ लाख ३१ हजार ६१५ मालमत्ताधारकांनी कर भरत सकारात्मक प्रतिसाद दिला. थकबाकीदारांवर कठोर कारवाई, व्यापक जनजागृती, तसेच अभय योजनेतून मिळालेला प्रतिसाद यामुळे महसुलात लक्षणीय वाढ झाली. निवडणूक प्रक्रियेमुळे काही प्रमाणात अडथळे आले असतानाही प्रशासनाने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली असून प्रामाणिक करदात्यांमुळेच हे शक्य झाले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात सुमारे २१ कोटी ५० लाख रुपयांची वसुली करत महसूलात लक्षणीय वाढ नोंदवली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे १ कोटी रुपयांची वाढ झाली असून हा विभागासाठी विक्रमी टप्पा ठरला आहे.

दंड व विलंब शुल्क, जाहिरात परवाना शुल्क, फलक भाडे आणि जाहिरात कर या विविध माध्यमांतून उत्पन्न वाढले. नियमांची काटेकोर अंमलबजावणी, अनधिकृत जाहिरातींवर कारवाई, तसेच तंत्रज्ञानाधारित आणि पारदर्शक कार्यपद्धतीमुळे महसूलवाढ साध्य झाली असून यामुळे महापालिकेच्या आर्थिक बळकटीकरणास चालना मिळणार आहे.

### अग्निशमन विभागाची महसूलात भरारी; १७८.२७ कोटींचे उत्पन्न

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात १७९ कोटी ६९ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल १६ कोटी ६४ लाखांची वाढ झाली आहे. अग्निसुरक्षा परवाने, इमारतींच्या फायर ऑडिट शुल्क, एनओसी प्रक्रिया तसेच आपत्कालीन सेवांमधून मिळणारे उत्पन्न यामध्ये वाढ झाली आहे. शहरातील वाढती नागरिकरणाची गती लक्षात घेता अग्निशमन विभागाने आधुनिक यंत्रणा, जलद प्रतिसाद प्रणाली आणि नियमित तपासणी मोहिमा यावर भर दिला आहे. परिणामी, केवळ महसूल वाढ नाही तर नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी अधिक सक्षमपणे पार पाडत विभागाने आर्थिक व सेवा या दोन्ही आघाड्यांवर प्रभावी कामगिरी केली आहे.

### पाणीकर वसुलीत महापालिकेची विक्रमी झेप; ८०.७४ कोटींची ऐतिहासिक नोंद

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ८० कोटी ७४ लाख रुपयांहून अधिक पाणीकर वसूल करत आतापर्यंतची सर्वोच्च कामगिरी नोंदवली आहे. क्षेत्रनिहाय वसुलीत सांगवी विभागाने सर्वाधिक ७.६५ कोटींची वसुली करत आघाडी घेतली. थकीत मिळकतधारकांवर कारवाई, डिजिटल नोटिसा, तसेच ऑनलाइन सुविधांमुळे वसुली प्रक्रियेला गती मिळाली. या वाढीव महसुलातून पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करण्यासाठी जलवाहिन्यांचे जाळे, गळती नियंत्रण, जलशुद्धीकरण प्रकल्पांचे आधुनिकीकरण आणि वितरण क्षमता वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## नगर जिल्ह्यातील लांब पल्ल्याच्या कावडींचे परतीच्या प्रवासात जेजुरी येथे स्वागत

जेजुरी (दैनिक संध्या) : नगर जिल्ह्यातील कळस, परखतपूर व कुंभेफळ या श्री क्षेत्र शिखर शिंगणापूर येथे धार घालण्यासाठी जाणाऱ्या तीन कावडींचे आज (गुरुवार) श्री क्षेत्र जेजुरी येथे परतीच्या प्रवासात स्वागत करण्यात आले. चैत्र शुद्ध पंचमी म्हणजेच २३ मार्च ते चैत्र वद्य तृतीया म्हणजेच ६ एप्रिल असा पंधरा दिवस पायी प्रवास करत तब्बल सातशे किलोमीटरचा लांबचा पल्ला पार करत गेली साडेतीनशे वर्षांहून अधिक काळ हा सोहळा कै. प .पू. सुभाषपुरी महाराज यांच्या आशीर्वादाने सुरू आहे. कळस गावचे रहिवाशी डॉ. शिवाजी ढगे व सौ. डॉ. शीतल ढगे यांच्या वतीने गेली चाळीस वर्षे जेजुरी येथे हा स्वागताचा कार्यक्रम होत आहे. महाआरती आणि कावड भक्तांसाठी महाप्रसाद वाटप करून ढगे दांपत्याने ही परंपरा अखंड सुरू ठेवली आहे. जेजुरी येथील शिवभक्त राजू चव्हाण यांच्या निवासस्थानी अनेक भाविकांच्या उपस्थितीत कावडींचा स्वागत कार्यक्रम पार पडला. महिला बालकल्याण उपायुक्त सुधीर साळवी, सासवड पालिका सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण, डॉ. रमेश देसाई, निवृत्ती आबा बागडे, अरविंद भोसले, रत्नमाला शिंदे, शारदा सावंत, विलास पवार, शाम कांबळे, मंगेश पावडे, सरस्वती गद्रे सुरेश कुंभारकर अरविंद भोसले यांसह अनेक शिवभक्त यावेळी उपस्थित होते. पायी वारीत सुमारे शंभरहून अधिक भक्त सहभागी झाले असून वयोवृद्ध देवासर वाकचौरे, चंद्रकांत वाकचौरे, पोपट वाकचौरे , वेदांत ढगे, प्रथमेश गोसावी यांचा सहभाग आहे.

## कांबळा बैठकीने येणाऱ्या मुक्ताबाई यात्रेच्या नियोजनाची सुरुवात




नारायणगाव (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्याचा 'ब'तीर्थक्षेत्र लाभलेल्या उत्तर पुणे जिल्ह्यात 10 दिवस चालणारी सर्वात मोठी नारायणगाव येथील श्री मुक्ताबाई व काळोबा देवस्थानची यात्रा.या यात्रेमध्ये मुख्य 4 दिवस धार्मिक कार्यक्रम होतात व पुढील 4 दिवस तमाशाचा कार्यक्रम होतो.यनिमित्ताने मांडव डहाळे, शेरणी वाटप,देवीस चोळी पातळ,आकर्षक घागरी मिरवणूक, शोभेचे दारूकाम, कुस्त्यांचा भव्य आखाडा याशिवाय यात्रेत 10 दिवस आकर्षक पाळणे भाविक भक्तांचे आकर्षण असते.तसेच या यात्रेत विक्रांत नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून 4 कोटींचा विमा काढण्यात येतो.या पार्श्वभूमीवर 13 एप्रिल 2026 रोजी सुरु होणाऱ्या या यात्रेच्या पूर्व तयारीसाठी हनुमान जयंतीच्या दुसऱ्या दिवशी यात्रा कमिटी व ग्रामस्थांचा कांबळा बसवण्यात आला. त्याची आज सकाळी मुक्ताबाई मंदिरापासून ग्रामप्रदक्षिनेद्वारे देवीच्या प्रतिमेची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.



## बाबू पाटे यांनी अधिकाऱ्यांशी केली शेतकऱ्यांच्या अडचणींवर चर्चा

नारायणगाव (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, विभागीय कार्यालय मंचर येथे अधिकारी राहुल गवारे साहेब यांची वारूळवाडी येथील शेतकरी प्रश्नांबाबत जुन्नर तालुका शिवसेनाप्रमुख बाबू पाटे यांनी आज भेट घेतली.सध्या उन्हाळी हंगाम चालू असून उन्हाची ताप मोठ्या प्रमाणावर पडत असल्यामुळे पिकांना रोज पाण्याची आवश्यकता असते. शेतातील उभी पिके जळू नाही म्हणून या भेटीदरम्यान वीज वितरण कंपनी करत असलेले लोड शेडींग तसेच शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींची सविस्तर माहिती घेण्यात येऊन त्यावर लवकरात लवकर सकारात्मक तोडगा काढावा अशी विनंती नारायणगावचे उपसरपंच तथा शिवसेना तालुका प्रमुख बाबू पाटे यांनी यावेळी केली.



## शिरूर तालुक्यातील शेतातील विद्युत मोटारी चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश

■ ५० किलो तांब्याच्या तारांसह ३ जण अटकेत

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यात शेतातील इलेक्ट्रिक मोटर चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा शिरूर पोलिसांनी पर्दाफाश करत २० गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईत ५० किलो तांब्याच्या तारा तसेच सुमारे ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलिसांनी या प्रकरणात टोळीतील तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून चोरीसाठी वापरण्यात आलेले वाहन आणि मोटरसायकलही जप्त करण्यात आली आहे. तपासा दरम्यान आणखी दोन साथीदारांची नावे समोर आली असून त्यांचा शोध सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून शिरूर तालुक्यातील विविध भागात शेतीसाठीच्या इलेक्ट्रिक मोटर चोरीच्या घटना वाढल्या होत्या. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते. या पार्श्वभूमीवर पोलिस निरीक्षक संदीप केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि सीसीटीव्हीच्या आधारे तपास करत आरोपींना जेरबंद केले. तपासात आरोपी हे परराज्यातील असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांनी शिरूर सह इतर भागातही अशाच प्रकारचे गुन्हे केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.सदरची कारवाई ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे,उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. शेतातील मोटर, पंप व अन्य उपकरणे सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी तसेच संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन शिरूर पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुणे जिल्ह्यात पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या वेळेत बदल

**पशुपालकांना मिळणार नियोजित सेवा; आपत्कालीन सेवेसाठी २४ तास सुविधा**




नाझरे सुपे (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या कामकाजाच्या वेळेत बदल करण्यात आला असून हे नवीन वेळापत्रक तत्काळ लागू करण्यात आले आहे. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, जिल्हा परिषद पुणे यांनी याबाबत परिपत्रक काढले आहे.

नवीन नियमानुसार जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालय, तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालय तसेच फिरते पशुवैद्यकीय दवाखाने सोमवार ते शुक्रवार सकाळी ८ ते दुपारी १.३० आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू राहणार आहेत. शनिवारी सकाळी ८ ते दुपारी १ या वेळेतच दवाखाने सुरू राहतील.

दरम्यान, दुपारच्या विश्रांतीच्या वेळेत पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये भेटी देऊन पशुपालकांना मार्गदर्शन करणे, शासकीय योजनांची माहिती देणे तसेच जनजागृती करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच पशुधनाच्या आपत्कालीन उपचारासाठी २४ तास पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यातील पशुपालकांना अधिक प्रभावी व वेळेवर सेवा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. नवीन वेळापत्रकामुळे पशुवैद्यकीय सेवा अधिक शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने मिळण्यास मदत होईल. विशेषतः आपत्कालीन परिस्थितीत २४ तास सेवा उपलब्ध ठेवण्याचा निर्णय पशुपालकांसाठी दिलासादायक आहे. तसेच दुपारच्या वेळेत गावपातळीवर जाऊन मार्गदर्शन करण्याच्या सूचनेमुळे पशुपालकांमध्ये जनजागृती वाढण्यास मदत होणार आहे. प्रशासनाने या वेळापत्रकाची प्रभावी अंमलबजावणी करावी अशी अपेक्षा पशुपालकांकडून व्यक्त होत आहे.

## बारामती पोटनिवडणूक : राष्ट्रवादीच्या प्रभाग भेट दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

*नागरिकांशी थेट संवाद; स्थानिक प्रश्नांवर चर्चा, विकासाचा दिलासा : पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचा वाढता प्रतिसाद*

बारामती (दै. संध्या)



आगामी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने शहरातील विविध प्रभागांमध्ये प्रभाग भेट दौऱ्याचे (घोंगडी बैठकीचे) वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रभागामध्ये प्रभाग भेट दौऱ्याला (घोंगडी बैठकीला) सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष किरण इंगळे यांनी दिली. १ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान हा दौरा पार पडणार असून, नागरिकांशी थेट संवाद साधण्यावर भर देण्यात आला आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतीस स्मरण करून, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्यसभा खासदार पार्थ पवार, युवा नेते जय पवार यांच्या सूचनेनुसार प्रभाग भेट दौऱ्याचे (घोंगडी बैठकीचे) आयोजन करण्यात आले आहे. या प्रभाग भेट दौऱ्यामध्ये बारामती नगर परिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव, बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष किरण इंगळे, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, माजी नगराध्यक्ष इम्तियाजभाई शिकीलकर ,युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे, विद्यार्थी अध्यक्ष मेघराज माने, राष्ट्रवादी शहर कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी (PRO) सुरज देवकाते, बारामती नगर परिषदेचे गटनेते, उपगटनेते, सभापती, आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका, सर्व सेलचे अध्यक्ष व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होत आहे. प्रत्येक प्रभागात सभा, भेटीगाठी आणि संवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील विविध भागांमध्ये जाऊन स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेणे, तसेच पक्षाची भूमिका आणि विकासाची दृष्टी स्पष्ट करणे, हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले.

असा आहे प्रभाग भेट दौरा....

१ एप्रिल रोजी भैरवनाथ मंदिर तांदुळवाडी , बौद्ध विहार, राम मंदिर राम गल्ली, सावित्रीबाई फुले सभागृह पान गल्ली, परिसरात प्रभाग भेट दौऱ्याची सुरुवात होणार आहे. त्यानंतर २ एप्रिल रोजी, राष्ट्रवादी भवन कसबा, मोरया नगर ओपन स्पेस गणपती मंदिर शेजारी, अवचट इस्टेट गणपती मंदिर शेजारी, अनंत फ्लावर गार्डन माऊली नगर, शुक्रवार ३ एप्रिल रोजी महात्मा फुले समाज मंदिर पाटस रोड, क्षेत्रीय कार्यालय टकार कॉलनी, तांदुळवाडी वेस चौक विठ्ठल मंदिर शेजारी, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर होलार समाज मंदिर, शनिवारी ४ एप्रिल रोजी पिडीसी बँक जवळ सेफी वुमन शेजारी, राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालय शारदा प्रांगण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत ओपन स्पेस, बुरुड हाउसिंग सोसायटी समाज मंदिर, बौद्ध विहार सिद्धार्थनगर, रविवार ५ एप्रिल रोजी खंडोबा नगर चौक, जामदार रोड, राष्ट्रवादी भवन कसबा, माळेगाव कॉलनी दत्त मंदिर, मंगळवार ७ एप्रिल रोजी महिला सोसायटी ओपन स्पेस, सूर्यनगरी ओपन स्पेस, गावठाण काळेश्वर मंदिर जळोची, देसाई इस्टेट गणपती मंदिर, श्री गणेश मंदिर कांचन नगर, रुई गाव मारुती मंदिर, बुधवार ८ एप्रिल रोजी सिद्धिविनायक मंदिर अशोक नगर, दत्त मंदिर कृषी देवता नगर, दत्त मंदिर वसंत नगर, अशोक नगर गणपती मंदिर, या ठिकाणी बारामती शहर राष्ट्रवादी पार्टीच्या वतीने प्रभात भेट दौरा (घोंगडी बैठक) पार पडणार आहे .राष्ट्रवादी काँग्रेसच्या या नियोजित दौऱ्यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. स्थानिक नागरिकांकडूनही या दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून येत्या काही दिवसांत प्रचार अधिक तीव्र होणार असल्याचे चित्र आहे.

## चेअरमन पदी अशोक साकोरे तर व्हॉईस चेअरमनपदी बाळासाहेब वंजारे



कोरेगावमुळ (दै. संध्या)

पूर्व हवेली तालुक्यातील औद्योगिक दृष्ठ प्रगतशील समजल्या जाणाऱ्या फुलगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी अशोक दत्तात्रय साकोरे व व्हाइस चेअरमन पदी बाळासाहेब उर्फ जितेंद्र यशवंत वंजारे यांची बिनविरोध निवड पार पडली. बिनविरोध निवडीचा पायंडा समाजासमोर एक नवा आदर्श फुलगाव ग्रामस्थ व सोसायटीने उभा केला आहे. चेअरमन पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल अशोक साकोरे, तर व्हॉईस चेअरमन पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल बाळासाहेब वंजारे यांचा सत्कार लोणीकंद - पेरणे जिल्हा परिषद गटाचे सदस्य पै.किरण साकोरे व उपस्थित प्रमुख मान्यवर, सोसायटीचे संचालक यांच्या हस्ते पार पडला. यावेळी फुलगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे संचालक पोपट अंकुश खुळे, संचालक चंद्रभागा ज्ञानोबा गवारे, संचालक पै.किरण साकोरे, संचालक अविनाश साकोरे, संचालक अमित खुळे, संचालक नर्मदा खुळे, संचालक नवनाथ वागस्कर, संचालक मच्छिंद्र वागसकर, संचालक सागर वागस्कर, संचालक अतुल वागस्कर, संचालक बाबाजी कदम, आदी पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. हवेली तालुक्यात बऱ्याच सहकारी सोसायटी पंचवार्षिक निवडणुका या बिनविरोध होत नाहीत परंतु फुलगाव येथे एम.आय.डी.सी.औद्योगिक क्षेत्र असून गावचा आर्थिक स्तर उंचावला असताना देखील फुलगाव सोसायटीची निवडणूक यावर्षीही बिनविरोध करण्यासाठी गावानी एकत्र येऊन प्रयत्न यशस्वी केल्याचे सोसायटीचे संचालक तथा जिल्हा परिषदेचे सदस्य पै.किरण साकोरे यांनी सांगितले.

## शिरूर सह तालुक्यात अनेक ठिकाणी गॅस टंचाई?

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर शहर व परिसर व तालुक्याच्या ग्रामीण भागात ही गॅसची टंचाई ? आता जाणवू लागल्याने अनेक छोटे-मोठे व्यावसायिक चिंतेत सापडले आहेत. गॅस पुरवठा कमी झाल्यामुळे हॉटेल, मेस,भजी,वडापाव गाड्या व इतर खाद्य व्यवसायांवर थेट परिणाम होताना दिसत आहे.

अनेक ठिकाणी गॅस उपलब्ध नसल्याने लाकडी चुलींचा वापर पुन्हा सुरू झाला आहे. त्यामुळे कामकाजावर परिणाम होऊन काही ठिकाणी व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ आली आहे.

मेस चालक व इतर व्यावसायिकांनी गॅस पुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी केली आहे. तसेच गृहिणींना ही वेळेवर गॅस सिलिंडर न मिळाल्याने दैनंदिन स्वयंपाकाचे नियोजन पूर्ण कोलमडत चालले आहे. त्यामुळे बुकिंग नंतर तात्काळ टाकी उपलब्ध करून देण्याची मागणी सर्वसामान्य नागरिक व महिला वर्गातून होत आहे.

## महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन

राजगुरुनगर (दै. संध्या)



खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात 'बारावी नंतरचे करिअर' या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या बाफना रंगमंदिराच्या सभागृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी बारावीचे विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या संचालिका उर्मिलाताई सांडभोर, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, प्राचार्या संध्या कांबळे, उपमुख्याध्यापिका रेखा जाधव, कनिष्ठ महाविद्यालयाचे विभाग प्रमुख दशरथ पिलगर, पर्यवेक्षक लतीफ शाह, सुनीता ठाकूर, संदेश जाधव उपस्थित होते. करिअर मार्गदर्शक व समुपदेशक विवेक वेलणकर म्हणाले की मेडिकल व इंजिनिअरिंग शिवाय बारावी शास्त्र शाखेनंतर अनेक अनेक पर्याय उपलब्ध आहेत. पशुवैद्यक, आर्किटेक्चर, बायोटेक्नॉलॉजी, संशोधन क्षेत्र, संरक्षण क्षेत्र, ॲग्रिकल्चर, फार्मसी, गणित व संख्याशास्त्र या क्षेत्रांमध्येही उत्तम करिअर होऊ शकते. पालक व विद्यार्थ्यांनी अशा परीक्षा व अभ्यासक्रमाची माहिती घेऊन आपल्या पाल्याच्या दृष्टीने ध्येय निश्चित करावे. पर्यवेक्षक संदेश जाधव यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. माधुरी हुंडारे यांनी सूत्रसंचालन केले. दीपक वाळुंज यांनी आभार मानले.

# तमाशा कलावंतावरील भ्याड हल्ल्याने संगमनेर तालुक्याला कलंक

नारायणगाव (दै. संध्या)




वरुडी पठार हे गाव संगमनेर तालुक्यातील आहे .संगमनेर तालुक्याला कलेचा इतिहास फार अभिमानास्पद आहे. तमाशा क्षेत्रात पहिली महिला नृत्यांगना म्हणून संगमनेर तालुक्याचे नाव उज्वल करणारी पवळाबाई हिवरगावकर, पुरुषी आवाजामध्ये महाराष्ट्रात सुप्रसिद्ध पोवाडा सादर करणाऱ्या विठाबाई जीवनगौरव पुरस्कार प्राप्त तमाशा सम्राज्ञी कांताबाई सातारकर, विठाबाई जीवन पुरस्कार प्राप्त गुलाबबाई संगमनेरकर, पद्मश्री पुरस्कार प्राप्त कलाभूषण रघुवीर भाऊ खेडकर यांचा हा कलेचा तालुका म्हणून ओळखला जात आहे.

या संगमनेर तालुक्याला लोककलेचा वारसा लाभलेला आहे. या महान कलावंतांनी संगमनेर तालुक्याचे नाव मोठे केले. खर तर! कलावंतांना आश्रय देण्याऐवजी त्यांच्यावरती भ्याड हल्ला केला .या तालुक्यातील वरुडी पठार गावातील तरुणांनी हा हल्ला केला.त्यामुळे या नादान तरुणांच्या गैरकृत्याने लोककलेचे माहेर समजले जाणा-या संगमनेर तालुक्याला कलंक लागला आहे.यापुढे वरुडी गावाला आणि संगमनेर तालुक्यातील अनेक गावांना यात्रेच्या निमित्ताने तमाशा ठरविताना फडमालक निश्चित विचार करतील .आणि यापुढे वरुडी गावात कधीही तमाशा होणार नाही. याची दखल तमाशा फड मालक संघटना घेणार आहे.

चैत्र महिना म्हटलं की, जत्रायात्रांचा हंगाम सुरू होतो. गावची यात्रा तमाशा शिवाय ही समृद्ध होत नाही".चैत्र महिन्यात नारायणगाव येथे राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर तमाशा पंढरीत प्रत्येक वर्षी 35 ते 40 तमाशा फडांची कार्यालये स्थापन होतात .या कार्यालयात महाराष्ट्रातील अनेक गावात यात्रेच्या निमित्ताने तमाशा कार्यक्रमाचे बुकिंग केले जाते. दोन दिवसापूर्वी राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या तमाशा सम्राज्ञी विठाबाई भाऊ नारायणगावकर यांच्या तमाशा फडाच्या गाड्यातील कलावंतांवर घारगावच्या वरुडी पठार तालुका संगमनेर गावच्या काही तरुणांनी हल्ला केला.त्यामध्ये महिलांचा विनयभंग करून कलावंतांना मारहाण केली. तसेच त्यांच्या गळ्यातील चैन ,आणि रोख रक्कम लंपास केली.यासंदर्भात घारगाव पोलीस स्टेशन येथे पोलीस तक्रार दाखल करण्यात आली आहे.

"खरं तर! महाराष्ट्रातील लोक कलावंत ही महाराष्ट्राची लोकसंस्कृती जपण्याचे काम करतात".आपले दुःख, आपल्या संसारातील दुःख हे पदराआड करून यात्रेच्या निमित्ताने तमाशा रसिकांच्या चेहऱ्यावरच्या हसू निर्माण करण्याचे काम करतात. गावची यात्रा समृद्ध करतात. 'नव्हे नव्हे तरी यात्रा तमाशामुळे मोठ्या उत्साहात साजरी होते ' 'तमाशा हे उत्तम प्रबोधन आणि मनोरंजनाचे साधन आजही मोठ्या प्रमाणात आपणांस माहित आहे'. महाराष्ट्राची लोकसंस्कृती जपणाऱ्या अशा लोककलावंतांचा आदर करण्याऐवजी काही नत भ्रष्ट झालेले तरुण , विकृत विचाराने मदधुंद झालेले तरुण या कलाकारांचा सन्मान न करता त्यांना अपमानित करतात.अशा या नराधमांना कडक शिक्षा झाली पाहिजे .पुन्हा अशा विकृत घटना महाराष्ट्रात होणार नाही . याची दखल शासनाने घेतली पाहिजे.यासाठी तमाशा पंढरीत या घटनेचा तीव्रप्रसाद उमटला. तमाशा पंढरीत सर्व फडमालक,व्यवस्थापक,

कर्मचारी, ग्रामस्थ, तमाशा रसिक यांचै वतीने निषेध जाहीर व्यक्त करण्यात आला .

या निमित्ताने राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या विठाबाई भाऊ नारायणगावकर,या तमाशा फडाचे संचालक मोहित नारायणगावकर, ज्येष्ठ व्यवस्थापक अशोक काटे, द युवा पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा अध्यक्ष काशिनाथ आल्हाट , नारायणगाव यात्रा कमिटीचे सदस्य रामभाऊदादा शेवाळे, चंद्रकांत ढवळपुरीकर तमाशा फडाचे मालक संतोष ढवळपुरीकर, दिपाली सुरेखा तमाशा फडाचे संचालक शशि सोनवणे, व्यवस्थापक जयवंत गायकवाड,तमाशा रसिक रघुनाथ पवार,महेश शिंगोटे,अशोक शिंदे, स्वप्नील माळवे,रवी कुटे आदि मान्यवर उपस्थित होते. या घटनेचे संपूर्ण महाराष्ट्रभर प्रतिसाद होऊन उमटत आहे.

या घटनेतील आरोपी सुमित शांताराम गुंजाळ ,संकेत शांताराम बांगर ,सोमेश सुखदेव बोंबले, दत्तात्रय रावसाहेब पडवळ सर्व राहणार वरुडी पठार यांना कडक शिक्षा झाली नाही तर सर्व लोककलावंतांच्यावतीने भव्य आंदोलन केले जाईल.असा इशारा तमाशा कलेचे अभ्यासक काशिनाथ आल्हाट यांनी दिला आहे.

# लोहार पाणक्याने राजाला शिकवला धडा




ब्राह्मण इतरांपेक्षा खूप ज्ञानी व बुद्धिमान असतात म्हणून त्यांना सर्वच क्षेत्रात जास्त नोकऱ्या दिल्या जातात. वास्तविक तो त्यांच्या योग्यतेचा सन्मानच आहे.असा समज मनुवादी विचारधारेच्या लोकांनी करून ठेवला. म्हणूनच एक म्हण प्रसिद्ध आहे "ब्राह्मण किती ही झाला भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ" त्याला राजर्षी शाहू महाराज यांनी खोडून काढण्यासाठी गंगाराम कांबळेंना चहाचे दुकान काढण्यास शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले.ते स्वतः या दुकानात जात व "गंगाराम चहा आण" अशी ऑर्डर पुकारीत.महाराज चहा घेऊ लागल्यामुळे सोबतच्या मंडळींनाही तिथे चहा घेणे भाग पडे.हाताशी असलेली राजसत्ता दलितांच्या वस्त्या सुधारू शकत नसेल, तर त्याचा उपयोग काय ? याची जाणीव असलेला लोकराजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज यांना झाली होती.ते त्यांनी आपल्या संस्थान मध्ये सर्व समाजाला शिक्षणात नोकरीत विशेष सवलती देऊन समान न्याय समान अधिकार दिला हा इतिहास काही लोक विसरतात.

सागर रामभाऊ तायडे, ९९२०४०३८५९, भांडूप मुंबई

शेतकरी शेतमजूराच्या मुलाने सरकारी नोकरीसाठी परीक्षा दिली त्यात तो पास झाला तर कशी मानसिकता काम करते त्याचे अनेक उदाहरण वृत्तपत्रात वाचले असतील. शेतमजूर म्हणजे अशी व्यक्ती जी स्वतःच्या शेताऐवजी दुसऱ्याच्या शेतात किंवा शेती व्यवसायात (पशुपालन, मशागत, कापणी इ.) शारीरिक श्रम करून रोख रक्कम किंवा वस्तूंच्या स्वरूपात मजुरी मिळवते.हे मजूर प्रामुख्याने भूमिहीन असून रोजंदारी किंवा हंगामी तत्त्वावर काम करतात.जे लोक शेतीतील विविध कामांसाठी रोजनदारी वर काम करतात, त्यांना शेतमजूर म्हणतात.जमिनीची मशागत,पेरणी,कापणी, पिके काढणे,पशुधन सांभाळणे आणि इतर शेतीविषयक कामे करणे हे मजूर प्रामुख्याने त्यांच्या शारीरिक श्रमावर आणि रोजंदारीवर जगतात. भूमिहीन शेतमजूर ज्यांची स्वतःची जमीन नाही.आणि अल्पभूधारक ज्यांची जमीन कमी आहे आणि जे दुसऱ्यांच्या शेतातही काम करतात.ग्रामीण अर्थव्यवस्थेत हे सर्वात असुरक्षित,असंघटित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट मानले जातात.शेतमजूर हे भारतीय शेतीचा कणा आहेत,तरीही त्यांना अनेकदा सामाजिक आणि आर्थिक संकटांना सामोरे जावे लागते. यामुळेच त्यांच्या मुलाचे शिक्षण नववी दहावी च्या पुढे जात नाही.ज्याने कोणी जिद्दीने शिक्षण घेतले तरी नोकरी मिळेलच यांची शास्वती नसते. तेव्हा तो जे काम मिळेल ते करून वाटचाल करत असतो.तेव्हा सुरक्षित नोकरी करणाऱ्या सुरक्षित ठिकाणी राहणाऱ्या लोकांच्या पोटात गोळा उठतो. कारण त्यांच्या मुलांना सर्व सुख सुविधा आणि बौद्धिक प्रशिक्षण देणारे कल्लास लावले असतांना ही विजयी होत नाही, त्यामुळेच त्यांना कष्टकरी शेतकरी शेतमजुरांच्या मुलांचा जिद्दीने कष्ट करून मिळविलेला विजय पचत नाही. ते कौतुक तर करत नाहीत, उलट आम्हाला ही आता शेतकरी,शेतमजूर झाले पाहिजे,तरच आमचे मुले स्पर्धा परीक्षेत,पोलीस भरती परीक्षेत पास होतील अशी प्रतिक्रिया व्यक्त करता, त्याना शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांना सरकारी नोकरी मिळाली की असे शब्द काय संकेत देत असतात. बुद्धिमान असणे हे विशिष्ट समाजाची जन्मजात मक्तेदारी असते.असा समज त्यांनी सर्वच क्षेत्रात करून ठेवला.तो कसा खोटा आहे हे एका राजाला लोहार पाणक्याने बुद्धिमतेने करून दाखवला.त्यासाठी ही एक बोध कथा वाचा.


एकदा विराटनगरीचा राजा चंद्रभान याने राज्यातील लोकांमध्ये जमिनीचे वाटप केले. त्यांनी शेतकरी व मजूरांना कमी जमीन दिली व ब्राह्मणांना खूप जास्त जमीन दिली. ते पाहून लोकांनी राजाला 'असे का' असा प्रश्न केला.राजाने स्पष्टीकरण दिले की, ब्राह्मण इतरांपेक्षा खूप ज्ञानी व बुद्धिमान असतात म्हणून त्यांना जास्त जमीन देणे योग्य आहे. वास्तविक तो त्यांच्या योग्यतेचा सन्मानच आहे.ते ऐकून आपली पाळी येण्याची वाट पाहात उभ्या असलेल्या लोहाराला व पाणक्याला राग आला. दोघे मित्रही होते. त्यांनी आपसात बोलून राजाला धडा शिकवण्याचे ठरवले. जेव्हा लोहाराचा नंबर आला तेव्हा त्याला राजाने 'तुझ्या कामासाठी किती जमीन लागेल?' असे विचारले. लोहार म्हणाला,'मला लोखंडी घन व कानात जेवढे अंतर आहे तेवढी जमीन पुरेशी आहे.' हाच प्रश्न पाणक्याला विचारला तर तो म्हणाला, 'महाराज एका मोटेतील पाण्याने जेवढी जमीन ओली होईल तेवढी जमीन मला पुरेशी आहे.' राजाला त्यांचे बोलणे समजले नाही पण असे वाटले की, या दोघा मूर्खांनी तर खूपच कमी जमीन मागितली आहे. त्याने त्या सेवकांना त्यांना हवी तेवढी जमीन मोजून देण्याची आज्ञा दिली.

जेव्हा सेवक जमीन मोजू लागले तेव्हा लोहार म्हणाला, 'माझ्या लोखंडाच्या घनाचा आवाज ज्या जागेपर्यंत ऐकू येईल तिथपर्यंतची जमीन मला हवी.' पाणक्या म्हणाला, 'एक मोट पाणी जेवढ्या जमिनीवर शिंपडता येईल तेवढी जमीन मला हवी.' चकित झालेल्या सेवकांनी ती गोष्ट राजाला सांगितली. राजा म्हणाला, 'तुम्ही तर खूपच जमीन कमी जमीन मागत होता, आता सेवकांना का त्रास देता? याची शिक्षा तुम्हाला माहीत नाही का?'. दोघे म्हणाले, 'माहीत आहे महाराज.' नंतर लोहार म्हणाला, 'महाराज, मी तर तेवढीच जमीन मागितली जेवढे घन आणि कानात अंतर आहे. सेवक ते ऐकतच नाही. मी चुकीची मागणी केली का?' नंतर पाणक्या म्हणाला, 'महाराज, मीही मोटभर पाण्याने जेवढी जमीन ओली होईल तेवढीच जमीन मागितली. त्यात माझी काय चूक?'

राजा लोहाराच्या आणि पाणक्याच्या हुशारीमुळे चकित झाला. त्याला त्यांच्या मर्जीची जमीन मोजून द्यावीच लागली. तो म्हणाला, 'हे दोघे तर ब्राह्मणांपेक्षाही बुद्धिमान आहेत. यांना प्रत्येकी दहा सुवर्णमुद्रा बक्षीस द्या.' ते दोघे म्हणाले,' महाराज, आम्हाला जमीनही नको आणि बक्षीसही नको. आम्ही फक्त हेच सांगू इच्छितो की, आपण स्वतः शेती न करणाऱ्या व इतरांच्या दानावर जगणाऱ्या ब्राह्मणांना जास्त जमीन देत आहात व जो जीवापाड कष्ट करून राज्याला सुखी करतो त्या मजूर,शेतकरी व कारागीरांना कमी जमीन देत आहात.' हे योग्य न्याय नाही. म्हणूनच आम्ही आमची बुद्धिमत्ता आपल्याला दाखवली.

राजा म्हणाला, 'बुद्धिमत्ता ही एखाद्या विशिष्ट वर्गाकडेच नसते याची तुम्ही मला जाणीव करून दिली. मला माफ करा. यापुढे मी कोणत्याही प्रकारचा पक्षपात करणार नाही. असे मी वचन देतो. तसेच यापुढे राज्यकारभारात तुमच्याशीही सल्लामसलत करीन.' आज कृषीप्रधान भारत देशातील शेतकरी, शेतमजूर यांची कदर केली जात नाही.अति पावसामुळे महापुर येऊन व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे खूप नुकसान करते.पण त्यांची नोंद सरकारी नोकरी करणारे प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी स्वतःला खूप बुद्धिमान समजून त्यांची नोंद घेत नाही.ते मात्र नोकरी वर असतांना आणि सेवानिवृत्त नंतर ही शासनाच्या अनेक योजनेचा लाभ घेत असतात. त्यांच्यासाठी सरकारी तिजोरीत असलेला पैसा त्यांच्या मेहनतीने गोळा झाला आहे. असा त्यांचा समज असतो. आणि शेतकरी, शेतमजुरांच्या योजनेसाठी सरकारच्या तिजोरीतून जाणारा पैसा फुकट दिला जातो असा त्यांचा एकूण कर्मचारी अधिकारी वर्गाचा समज असतो.आणि तेच सत्ताधारी मंत्रिमंडळात बुद्धीकौशल्य वापरून आम्ही किती बुद्धिमान आहोत हे सिद्ध करतात.मग काय होते हे आपण पाहिले वाचले असेल की शेतकरी, शेतमजुरांना दिली जाणारी कर्जमाफी देशाचे नुकसान करणारी आहे,आणि उद्योगपतीला दिली जाणारी कर्जमाफी देशाच्या हितकारक आहे. हे रिजर्व बँक चे आर्थिक संचालक सल्लागार सांगतात.ही देशातील बुद्धिमान समाज म्हणून ओळख असणाऱ्या समाजाची खरी बुध्दीमत्ता आहे. ती भारतीय संविधान निर्मात्याने मोडून काढली आहे. पण ती पूर्णपणे निघाली नाही हे इमानदार सेवक,चौकीदार,शेपन्न इंच छाती असणाऱ्या महा पराक्रमी विश्वगुरू ने वेळोवेळी दाखवून दिले आहे. शेतकरी,शेतमजूर कामगार,बेरोजगार तरुणांनी त्याला धडा शिकवला पाहिजे होता.पण प्रत्येक वेळा बुद्धीमत्ता असलेला समाज बुद्धीकौशल्य कट कारस्थान करून बहुसंख्य समाजाची फसवणूक करत आला आहे. त्याला अद्दल घडविण्यासाठी धडा शिकविण्यासाठी लोहार पाणक्या सारखी शेतकरी शेतमजूर पुढे आले पाहिजे.

# सकाळ की सायंकाळ; वजन सहजपणे कमी करण्यासाठी चिया सिड्स खाण्याची सर्वोत्तम वेळ कोणती?



चिया सिड्स सुपरफूडपैकी एक आहेत. लवकर वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी चिया सिड्स वरदानापेक्षा कमी नाही. त्यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. फायबरयुक्त पदार्थ खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते. यामुळे लवकर वजन कमी होण्यास मदत होते. परंतु, वजन कमी करणे हे तुम्ही चिया सिड्स केव्हा खाता यावर देखील अवलंबून असते. यामुळे चिया सिड्समधील अनेक पोषक तत्वे कोणत्या वेळी शरीरात सर्वाधिक पोहोचतात हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. चिया सिड्स खाण्याची वेळ आणि वजन कमी होणे यात खरोखरच काही संबंध आहे का? तसे असल्यास, त्याचा परिणाम काय होईल? जाणून घेऊया....

**सकाळी घेतल्यास :** सकाळी चिया सिड्स खाल्ल्याने तुमच्या दिवसाची सुरुवात खूप उत्साहाने होते. चिया सिड्स पाण्यात किंवा स्मूदीमध्ये मिसळून खाणं चांगलं असते. त्यामुळे तुम्हाला बराच वेळ भूक लागणार नाही. यामुळे भूक कमी होते आणि वजन खूप लवकर कमी होण्यास मदत होते. सकाळी या सिड्स खाल्ल्याने पचनशक्ती वाढते. बद्धकोष्ठता आणि अपचनासारख्या समस्या कमी होतात. याचे कारण म्हणजे यामध्ये फायबर भरपूर प्रमाणात असते. यामुळे शौचास साफ होण्यासही मदत होते. दीर्घकाळ ऊर्जा देण्यासाठीही हे उपयुक्त आहे. सकाळी हे खाल्ल्याने तुम्ही दिवसभर सक्रिय आणि सतर्क राहता.

**सायंकाळी चिया सिड्स खाण्याचे फायदे:** बऱ्याच लोकांना रात्री उशिरा खाण्याची तीव्र इच्छा होते. म्हणजेच, भात खाऊनही त्यांना रात्री भूक लागते. मात्र, जर तुम्ही सायंकाळी चिया सीड्स खाल्ले तर ही इच्छा कमी होऊ शकते. शिवाय भूक देखील कमी लागते. यामुळे पोटदुखीची समस्या टाळता येऊ शकते. परिणामी वजन सहज कमी होते. शिवाय, सायंकाळी चिया सीड्स खाल्ल्याने पचनशक्ती सुधारते. त्यातील फायबर रात्री झोपेनंतर चांगला परिणाम करतात. तसंच सायंकाळी चिया सिड्स खाल्ल्यास




दुसऱ्या दिवशी सकाळी, सहज शौच होते. अति खाण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, सायंकाळी चिया सिड्सचे सेवन करणे चांगले असते. यामुळे उच्च-कॅलरीयुक्त पदार्थ खाणे टाळलं जाऊ शकतात. परिणामी, खूप सहजपणे वजन कमी होते. मात्र, तुम्ही त्याचे सेवन कोणत्या वेळी करता यावर त्याचे फायदे अवलंबून असतात.

**ते घेण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता आहे?** चिया बिया थेट पाण्यात घालून लगेच घेऊ नका. त्याऐवजी, प्रथम एक ग्लास पाण्यात एक चमचा चिया सिड्स टाका. त्यांना किमान अर्धा तास भिजवून ठेवा. हे पाणी रिकाम्या पोटी प्या. तुम्ही ते दही आणि स्मूदीमध्ये मिसळूनही घेऊ शकता. चिया बियांमध्ये चरबीचे प्रमाण जास्त असल्यामुळे, त्या थोड्या थोड्या जेवणासोबत घेणे चांगले. किंवा तुम्ही त्या कोमट दुधात मिसळून पोषक तत्वे मिळवू शकता. जर तुम्ही त्या दुधासोबत घेत असाल, तर ते रात्री पिणे चांगले. कारण सकाळी रिकाम्या पोटी दूध पिणे चांगले नाही. यामुळे आम्लपित्त होऊ शकते.

**केव्हा अधिक चांगले आहे?** खरं तर, चिया सिड्सचे सेवन केव्हा करणे सर्वोत्तम आहे हे स्पष्ट सांगता येणार नाही. कारण त्याचे फायदे सेवनाच्या वेळेवर अवलंबून असतात. जर तुम्हाला जास्त अन्न न खाता वजन कमी करण्यावर नियंत्रण ठेवायचे असेल, तर सकाळी त्याचं सेवन करणं हा एक पर्याय आहे. दुसरीकडे, जर तुम्हाला रात्रभर शांत झोप हवी असेल आणि बद्धकोष्ठता कमी करायची असेल, तर सायंकाळी त्याचे सेवन करणे अधिक चांगले आहे.



# महिलांना मूत्रमार्गाचा संसर्ग का होतो?



मूत्रमार्गाचा संसर्ग (UTI) ही महिलांमध्ये आढळणारी एक सामान्य आरोग्य समस्या आहे. आकडेवारीनुसार, निम्म्याहून अधिक महिलांना त्यांच्या आयुष्यात कधी ना कधी या समस्येचा अनुभव येतो. मात्र, हा एक गैरसमज आहे की या संसर्गावर केवळ औषधोपचारानेच उपचार होऊ शकतो. प्रख्यात मूत्ररोगतज्ञ आणि पुरुषांच्या आरोग्याचे तज्ञ, डॉ. विश्वास एम.आर., स्पष्ट करतात की आपल्या रोजच्या पाच लहान सवयी शरीरातील जीवाणूंच्या वाढीस कारणीभूत ठरू शकतात. या सवयी सुधारून आपण या समस्येवर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवू शकतो. चला तर जाणून घ्या तुमच्या दैनंदिन जीवनातील कोणते पाच महत्त्वाचे बदल तुम्हाला या समस्येपासून आराम मिळवून देऊ शकतात...



**पुरेसे पाणी प्यायला विसरू नका :** यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशन (CDC) नुसार, कामाच्या ताणामुळे पाणी प्यायला विसरणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. डॉ. विश्वास एम. आर. यांच्या मते, ज्या महिला दररोज 1.5 लिटरपेक्षा कमी पाणी पितात, त्यांना मूत्रमार्गाचा संसर्ग (UTI) होण्याचा सर्वाधिक धोका असतो. पुरेसे पाणी न प्यायल्यामुळे, जिवाणू मूत्रमार्गातून बाहेर पडू शकत नाहीत. शरीरातील संसर्ग निर्माण करणारे जिवाणू बाहेर टाकण्यासाठी, दररोज किमान 2 ते 2.5 लिटर पाणी पिणे खूप महत्त्वाचे आहे. पुरेसे पाणी प्यायल्याने लघवी पातळ होते आणि संसर्गाची तीव्रता कमी होते.

**लघवी रोखून धरू नका :** तासन्तास लघवी रोखून धरणे ही एक हानिकारक सवय आहे. ज्यामुळे मूत्रमार्गाचा संसर्ग (UTI), किडनीचा संसर्ग, मूत्राशयाचे स्नायू कमकुवत होणे आणि मूत्राशयाच्या वेदना यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. या सवयीमुळे किडनीवर दाब वाढून त्यांना इजा पोहोचू शकतात. यामुळे मूत्रमार्गात अडथळा किंवा वारंवार संसर्ग होण्यासारख्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणून, जेव्हाही तुम्हाला लघवी करण्याची तीव्र इच्छा होईल, तेव्हा लगेच लघवी करण्याची सवय लावा.

**वैयक्तिक स्वच्छतेच्या वेळी विशेष काळजी घ्या :** महिलांसाठी, वैयक्तिक स्वच्छता करताना मागून पुढे पुसणे ही एक मोठी चूक आहे, ज्यामुळे मूत्रमार्गाचा गंभीर संसर्ग (UTI) होऊ शकतो. नेहमी पुढून मागे पुसा. मागून पुढे पुसल्यामुळे विष्ठेतील जीवाणू (जसे की ई. कोलाय) योनी आणि मूत्रमार्गापर्यंत पोहोचू शकतात.

**लैंगिक संबंधानंतर निष्काळजीपणा करू नका:** लैंगिक संबंधानंतर महिलांना संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते. म्हणूनच डॉक्टर सांगतात की, लैंगिक संबंधानंतर लघवी करणे हा महिलांसाठी मूत्रमार्गाचा संसर्ग (UTI) टाळण्याचा एक प्रभावी आणि सोपा मार्ग आहे. लैंगिक संबंधादरम्यान मूत्रमार्गात प्रवेश करणारे जीवाणू लघवीद्वारे बाहेर टाकले जातात. यामुळे संसर्ग टाळण्यास मदत होऊ शकते. महिलांचे मूत्रमार्ग लहान असल्यामुळे, जीवाणू अधिक सहजपणे मूत्राशयापर्यंत पोहोचू शकतात.

**अंतर्वस्त्र निवडताना काळजी घ्या :** आपल्या कपड्यांच्या निवडीमुळे मूत्रमार्गाच्या संसर्गाचा (UTI) धोका देखील वाढू शकतो. खूप घट्ट अंतर्वस्त्र घातल्याने जननेंद्रियांच्या आसपास हवेचा योग्य संचार होत नाही. यामुळे ओलावा साचतो, ज्यामुळे जिवाणूंना वाढण्यासाठी अनुकूल वातावरण तयार होते. म्हणून, सातत्याने सैल सुती कपडे किंवा अंतर्वस्त्रे घातल्याने हा संसर्ग टाळण्यास मदत होऊ शकते.

मूत्रमार्गाचा संसर्ग (UTI) लवकर लक्षात आल्यास, परंतु योग्य खबरदारी न घेतल्यास, त्याचे रूपांतर किडनीच्या संसर्गात होऊ शकते. डॉ. विश्वास एम.आर. यांच्या मते, या पाच पायऱ्यांचे पालन करून तुम्ही या गंभीर वेदनादायी आजारातून कायमची सुटका मिळवू शकता आणि निरोगी आयुष्य जगू शकता.



## मूत्रमार्गाच्या संसर्गाची लक्षणे

- मेडलाइन प्लसच्या मते, मूत्राशयाच्या संसर्गाच्या लक्षणांमध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे:
- गढूळ किंवा रक्तमिश्रित लघवी, जिचा तीव्र वास येऊ शकतो.
- सौम्य ताप (काही लोकांना तो नसूही शकतो)
- लघवी करताना वेदना किंवा जळजळ होणे
- पोटाच्या खालच्या भागात किंवा पाठीत दाब किंवा पेटके येणे
- मूत्राशय रिकामे झाल्यानंतरही वारंवार लघवीला जाण्याची तीव्र इच्छा होणे
- जर संसर्ग तुमच्या मूत्रपिंडांपर्यंत पसरला, तर लक्षणांमध्ये यांचा समावेश असू शकतो...

**थंडी वाजून येणे किंवा रात्री घाम येणे**

- थकवा आणि सर्वसाधारणपणे अस्वस्थ वाटणे
- 101°F (38.3°C) पेक्षा जास्त ताप
- काखेत, पाठीत किंवा जांघेत वेदना
- त्वचेवर लालसरपणा, उष्णता
- मानसिक बदल किंवा गोंधळ (वृद्ध व्यक्तींमध्ये, ही लक्षणे अनेकदा मूत्रमार्गाच्या संसर्गाची एकमेव चिन्हे असतात)
- मळमळ आणि उलट्या
- तीव्र पोटदुखी (कधीकधी)



# कॉफी प्यायल्याने यकृताचा कॅन्सर टाळता येतो?

बऱ्याच लोकांना सकाळी उठल्याबरोबर कॉफी पिण्याची सवय असते. त्यांच्या मते कॉफी प्यायल्याने ऊर्जा वाढते शिवाय एकाग्रतेत देखील वाढ होते. संशोधनातून असंही दिसून आले आहे की, कॉफी शरीरातील सर्वात महत्त्वाच्या अवयवांपैकी एक असलेल्या यकृताचे संरक्षण करते. चला, आता याबद्दल सविस्तर जाणून घेऊया!

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासानुसार, दररोज दोन कप कॉफी प्यायल्याने यकृताच्या कर्करोगाचा सर्वात सामान्य प्रकार असलेल्या हेपॅटोसेल्युलर कार्सिनोमाचा धोका सुमारे 35 टक्क्यांनी कमी होऊ शकतो. तज्ञांच्या मते, मद्यपान, हिपॅटायटीसचा संसर्ग आणि बॉडी मास इंडेक्स (BMI) यांसारख्या घटकांचा विचार केल्यानंतरही हे परिणाम सकारात्मक राहतात.

**कॉफी यकृताच्या कर्करोगाचा धोका कसा कमी करते?:** कॉफी हे केवळ एक कॅफीनयुक्त पेय नाही. तज्ञांच्या मते, त्यात चयापचय क्रियेसाठी फायदेशीर असलेले एक हजाराहून अधिक घटक असतात, ज्यात पॉलीफेनॉल, डायटरपीन आणि नैसर्गिक अँटीऑक्सिडंट्स यांचा समावेश आहे. हे घटक दाह कमी करतात आणि ऑक्सिडेटिव्ह ताणाला प्रतिबंध करतात असं म्हटलं जातं. शिवाय, अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, ते यकृताच्या फायब्रोसिसची वाढ मंदावू शकतात आणि यकृत एन्झाइमची पातळी सुधारू शकतात. परिणामी, कॉफीमुळे सिरोसिस आणि यकृताच्या कर्करोगाचा धोका कमी होतो. जे यकृताचे आजार गंभीर झाल्यावर होतात.

**संशोधन काय सांगते?** नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासानुसार, 1966 ते 2007दरम्यान केलेल्या अभ्यासांवर आधारित मेटा-विश्लेषणात असं आढळून आलं आहे की, दिवसातून दोन कप कॉफी प्यायल्याने यकृताच्या कर्करोगाचा धोका 43टक्क्यांनी कमी होतो.

बीएमजे जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, दररोज दोन कप कॅफीनयुक्त कॉफी प्यायल्याने एचसीसीचा धोका27% ने कमी होतो, तर तेवढीच कॅफीनविरहित कॉफी प्यायल्याने हा धोका 14% ने कमी होतो.

**किती कॉफी प्यावी?:** किती कॉफी प्यावी याबद्दल कोणतीही एक आंतरराष्ट्रीय शिफारस नसली तरी, तज्ञांच्या मते माफक प्रमाणात कॉफी पिण्याचे स्पष्ट फायदे आहेत. त्यांच्या मते, दिवसातून दोन ते चार कप कॉफी पिणे आरोग्यासाठी चांगले आहे. मग ती फिल्टर कॉफी असो वा इन्स्टंट कॉफी, त्याचा परिणाम सारखाच असतो, असं ते म्हणतात. तसचं तज्ञ असा इशारा देतात की, कॉफीच्या अतिसेवनामुळे पचनाचा त्रास, निद्रानाश किंवा हृदयाचे ठोके वाढणे यांसारखे दुष्परिणाम होऊ शकतात. त्यांच्या मते, हे प्रत्येक व्यक्तीच्या संवेदनशीलतेवर अवलंबून असते. एकूणच, संशोधनातून असं दिसून येते की, माफक प्रमाणात कॉफी पिणे हा यकृताचे आरोग्य राखण्याचा एक सोपा मार्ग आहे.

**मद्यपान आणि धूम्रपान:** तज्ञांच्या मते, यकृताच्या आरोग्यासाठी कॉफी पिणे सुरू ठेवल्यास मद्यपान आणि धूम्रपानाचा कोणताही फायदा होणार नाही. त्यांच्या मते, कॉफी या गोष्टींना पर्याय नाही.

**वैद्यकीय सल्ला:** हृदयविकार, तीव्र चिंता, पोटाचे विकार असलेल्या व्यक्ती किंवा गरोदर महिलांनी कॉफीबाबत वैद्यकीय सल्ला घ्यावा.

**जीवनशैली:** सकस आहार घेणे, निरोगी वजन राखणे आणि नियमित व्यायाम करणे याची शिफारस केली जाते. हे सर्व करत असताना कॉफी पिणे हे एक अतिरिक्त संरक्षण मानले जाते आणि त्याप्रमाणेच त्याचा विचार केला पाहिजे.



# दिवे घाट माथ्यावर श्री विठ्ठल मंदिराचे भूमिपूजन संपन्न

**सासवड (दै. संध्या)**

पुणे-पंढरपूर पालखी मार्गावरील दिवे घाट माथ्याचे आध्यात्मिक वैभव असलेल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या नूतन बांधकामाचा शुभारंभ गुरुवारी (दि. ३) मोठ्या उत्साहात करण्यात आला. माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत या मंदिराचे विधीपूर्वक भूमिपूजन संपन्न झाले. दिवे घाटाच्या सुरू असलेल्या रुंदीकरण कामामुळे येथील अनेक वर्षांचे जुने आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेले मंदिर काढण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर, वारकरी संप्रदायाची भावना जपण्यासाठी आणि भाविकांच्या सोयीसाठी घाट माथ्यावरच नवीन जागी भव्य मंदिर उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे. गुरुवारी सकाळी मंत्रोच्चार आणि विठूनामाच्या जयघोषात भूमीपूजनाचा विधी पार पडला.

> "दिवे घाट हा पालखी मार्गावरील महत्त्वाचा टप्पा आहे. रस्ता रुंदीकरणामुळे जुने मंदिर काढावे लागणार आहे. त्यामुळे घाटमाथ्यावरच भव्य आणि सुंदर मंदिर उभारले जाईल."
> — **संजय जगताप (माजी आमदार)**

याप्रसंगी बाबाराजे जाधवराव, हवेली पंचायत समितीच्या उपसभापती विद्याताई गायकवाड, बाळासाहेब साबळे, पंडितदादा मोडक, रमेशआप्पा मोडक, दत्ता गायकवाड सुनील गायकवाड, माऊलीआप्पा आंबेकर, नामदेव निवृत्ती आंबेकर, संजय आंबेकर, रामदास शेवाळे, तुकारामआबा मोडक, अनिलकाका गायकवाड, सचिन मोडक, सागर मोडक , शंकरदादा गायकवाड, महेश जाधव यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ आणि विठ्ठल भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ‘स्त्रीभ्रूणहत्या’ रोखण्याचे डॉक्टर भारती यांचे कार्य समाजासाठी दीपस्तंभ

**जेजुरी (दै. संध्या)**

"वैद्यकीय क्षेत्रात प्रदीर्घ काळ सेवा देताना 'मुलगा-मुलगी समान' हा विचार कृतीतून मांडणे गरजेचे आहे. गर्भ लिंगनिदान न करण्याच्या तत्त्वाशी प्रामाणिक राहून डॉ. सुशील भारती यांनी हजारो कुटुंबांना कुप्रथेपासून वाचवले आहे. ग्रामीण भागातील सामान्य जनतेला अल्प दरात उच्च दर्जाची सेवा देणारे त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी दीपस्तंभ आहे," असे प्रतिपादन थोर विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते अभय भंडारी यांनी केले. जेजुरी येथील 'श्री सद्गुरू पॅकेजिंग' च्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सासवड येथील प्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ. सुशील एस. भारती यांना अभय भंडारी यांच्या हस्ते 'विशेष कृतज्ञता सन्मानपत्र' देऊन गौरविण्यात आले. या वेळी व्यसनमुक्त युवक संघाचे पुणे जिल्हाध्यक्ष आनंद नाईक आणि अनंत देशमुख उपस्थित होते. श्री सद्गुरू पॅकेजिंग परिवारातर्फे गेल्या तीन वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी डॉ. भारती यांच्या माध्यमातून सोनोग्राफी सेवा दिली जात आहे. त्यांच्या सासवड येथील ३० वर्षांच्या निस्पृह सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. सुशील भारती यांनी शहरांमधील मोठ्या संधी सोडून ग्रामीण भागातील रुग्णांशी हृदयाची नाळ जोडली आणि आपल्या मृदू स्वभावाने रुग्णांना आधार दिला अशी भावना सामाजिक कार्यकर्ते तुषार देशमुख यांनी व्यक्त केली.

# सासवड नगरपरिषदेकडून ५.७० कोटींची विक्रमी कर वसुली

## अभय योजनेचा फायदा; थकीत कर भरण्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**ठळक बाबी :**

- ५.७० कोटी रुपयांची विक्रमी कर वसुली
- ४६५ मिळकतधारकांचा अभय योजनेत सहभाग
- ६५ लाख रुपयांची शास्ती माफी
- कर वसुलीसाठी विशेष मोहिमेचा सकारात्मक परिणाम

**नाझरे सुपे (दै. संध्या)**

सासवड नगरपरिषदेमार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात आलेल्या विशेष कर वसुली मोहिमेत तब्बल ५ कोटी ७० लाख रुपयांची विक्रमी वसुली करण्यात आली आहे. थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफीच्या अभय योजनेमुळे करदात्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिल्याने नगरपरिषदेला ही उल्लेखनीय कामगिरी करता आली.

थकीत कर वसुलीसाठी नगरपरिषद प्रशासनाने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अंतर्गत मालमत्ता सील करणे, नळ कनेक्शन बंद करणे आदी कारवाया केल्या. त्यामुळे अनेक थकबाकीदारांनी आपला थकीत कर भरला.

राज्य शासनाने जाहीर केलेल्या १०० टक्के शास्ती माफी अभय योजनेअंतर्गत ३१ मार्च २०२५ पर्यंत कर भरणाऱ्या मिळकतधारकांना दंड माफी देण्यात आली. या योजनेत सुमारे ४६५ मिळकतधारकांनी सहभाग घेतला असून त्यांना सुमारे ६५ लाख रुपयांच्या शास्ती माफीचा लाभ मिळाला.

नागरिकांच्या सोयीसाठी नगरपरिषदेकडून सुट्टीच्या दिवशीही कर भरणा केंद्र सुरू ठेवण्यात आले होते. ३१ मार्च रोजी मध्यरात्रीपर्यंत कर स्वीकारण्यात आले. या योजनेमुळे नगरपरिषदेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी दिली.

नगराध्यक्षा आनंदी चंद्रकांत जगताप म्हणाल्या, "अल्प कालावधीत झालेली कर वसुली समाधानकारक आहे. कर भरण्यास अडचण असलेल्या थकबाकीदारांसाठी अभय योजना दिलासादायक ठरली आहे. उर्वरित थकीत मिळकतधारकांनी अधिक माहितीसाठी सासवड नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधावा."

# थोडक्यात पण महत्वाचे...

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवनात आदरांजली




पुणे (दैनिक संध्या) : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवनातील त्यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्यास महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. याप्रसंगी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-1 जितेंद्र भोळे, उप सचिव विजय कोमटवार, उप सभापती यांचे खाजगी सचिव आविनाश रणखांब, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र संचालक निलेश मदाने यांचेसह अन्य अधिकारी व कर्मचारी यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

## शिधावाटप विभागाच्या दक्षता पथकाची मोठी कारवाई; 1.26 कोटींचा मुद्देमाल जप्त

पुणे (दैनिक संध्या) : शिधावाटप विभागाच्या राज्यस्तरीय दक्षता पथकाने मोठी कारवाई करत एलपीजी गॅस चोरीचा प्रकार उघडकीस आणला आहे. दि. २ एप्रिल २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या सूचनेवरून व गणेश बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वैजापूर रोडवरील मौजे खोजेवाडी शिवारात धाड टाकण्यात आली. हॉटेल साईयश परिसरात केलेल्या या कारवाईदरम्यान एलपीजी टँकरचे सील तोडून गॅस चोरी करताना दोन व्यक्ती आढळून आल्या. तपासात एचपी कंपनीचे दोन कॅप्सूल टँकर (क्रमांक MH43 K 5921 व MH43 CK 5747) आढळले. या टँकरमध्ये अनुक्रमे १७,५९० किलो व १७,६३० किलो एलपीजी गॅस साठवलेला होता. याशिवाय घटनास्थळावरून १९.२ किलो क्षमतेचे १७ भरलेले व ६ रिकामे सिलेंडर, १४.२ किलोचा १ भरलेला सिलेंडर तसेच ५ किलोचे २ भरलेले सिलेंडर जप्त करण्यात आले. एकूण ३५,२२० किलो एलपीजी गॅस, २ टँकर आणि २६ सिलेंडर असा सुमारे १ कोटी २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दक्षता पथकाच्या माहितीनुसार, जप्त केलेल्या गॅसचा घरगुती वापरासाठी उपयोग केला असता सुमारे २४८० कुटुंबांची गरज भागू शकली असती. या प्रकरणी संबंधित आरोपींविरोधात छत्रपती संभाजी नगर, एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## मोकाट कुत्र्यांचा उपद्रव रोखण्यासाठी जलद कृती दलाची जोरदार मोहीम



चाकण (दैनिक संध्या) : पुणे - नाशिक महामार्गावरील चाकण गावच्या हद्दीतील आंबेठाण चौकात असलेल्या उड्डाण पुलाजवळ भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मागील महिन्यात नांदेड जिल्ह्यातील एका बत्तीस वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची अत्यंत गंभीर घटना व त्यानंतर अनेक नागरिकांना कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला केल्याच्या घटना घडल्यामुळे चाकण परिसरात भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी जलद कृती दलाची जोरदार मोहीम सुरू करण्यात आली आहे. चाकण नगरपरिषदेने अत्यंत गांभीर्याने दखल घेत संबंधित परिसरात जलद कृती दल तैनात केले आहे. येथील आंबेठाण चौक, उड्डाणपूल व मार्केट यार्ड परिसरातील हल्ला करणाऱ्या भटक्या कुत्र्यांना त्वरित पकडण्यात येत आहे. पकडण्यात आलेल्या कुत्र्यांना नगरपरिषदेने तयार केलेल्या निवारा केंद्रात ठेवण्याची व्यवस्था केली आहे. कुत्र्यांवर रेबीज प्रतिबंधक लसीकरण व निर्बीजीकरण करण्यात आले आहे. चाकण शहरातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून सन २०२५ पासून कुत्रे निर्बीजीकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. जानेवारी २०२६ पासून आजपर्यंत चारशे कुत्र्यांवर ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली आहे. सद्यस्थितीत एबीसी केंद्रामध्ये भटक्या कुत्र्यांवर निर्बीजीकरण व लसीकरणाची प्रक्रिया सुरू असून शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांना पकडण्याची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. पिसाळलेल्या अथवा आक्रमक कुत्र्यांची तक्रार प्राप्त होताच जलद कृती दल तात्काळ घटनास्थळी पोहोचून जाळीच्या साहाय्याने अशा कुत्र्यांना पकडून सुरक्षित निवारा केंद्रात हलविण्याची कार्यवाही करीत आहे.

# 'नाथ साहेबांच चांगभलं'च्या जयघोषात फिरले बगाड

## सासवडमध्ये चैत्री उत्सवाचा जल्लोष

**पुणे (दै. संध्या)**

सासवड: सासवडचे ग्रामदैवत असलेल्या श्री काळभैरवनाथ, श्री भैरवनाथ आणि माता जोगेश्वरी यांच्या चैत्री उत्सवाला अत्यंत उत्साही आणि भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली आहे. उत्सवाचे मुख्य आकर्षण असलेले पारंपरिक 'बगाड' शुक्रवारी (दि. ३) मंदिरासमोर फिरवण्यात आले. हे विलोभनीय दृश्य डोळ्यांत साठवण्यासाठी अनेक भाविकांनी सासवडमध्ये गर्दी केली होती.

उत्सवाच्या पहिल्याच दिवशी पहाटेपासूनच धार्मिक विधींना सुरुवात झाली. पहाटे उत्सव मूर्तींना अभिषेक व महापूजा घालण्यात आली. संपूर्ण मंदिर परिसर फुलांच्या सजावटीने आणि सुगंधी धूप-दीपांनी उजळून निघाला होता.

सकाळी बगाड पूजनाचा विधी पार पडला. परंपरेनुसार मानकरी सेवेकरी बापूमहाराज गिरीगोसावी बुवा यांना बगाडात बसवून ते फिरवण्यात आले. 'काळभैरवनाथाच्या नावानं चांगभलं'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. आपल्या ग्रामदैवताला नैवेद्य दाखवण्यासाठी आणि दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. रात्रीपासून पहाटेपर्यंत पालखीची ग्रामप्रदक्षिणा तसेच मंदिरासमोरील प्रांगणात छबिन्याचा कार्यक्रम रंगला. पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि विद्युत रोषणाईत हा सोहळा झाला.



या मंगलमयी प्रसंगी माजी आमदार संजय जगताप, श्री काळभैरवनाथ ट्रस्टचे अध्यक्ष रमेश वामनराव जगताप, उपाध्यक्ष पांडूरंग भोंगळे, चैत्री उत्सव समितीचे अध्यक्ष अजय जगताप, उपाध्यक्ष नितीन भोंगळे यांच्यासह रवींद्रपंत जगताप, रामभाऊ इनामके, मोहन जगताप, चंद्रकांत गिरमे, विजय जगताप, आनंद जगताप, गणेश भैरवकर, सुरेश जगताप, वैभव जगताप, अमित पवार, आणि सचिव विठ्ठल शिंदे उपस्थित होते. तसेच ट्रस्टचे सर्व सदस्य, पुजारी आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

सासवडचा हा चैत्री उत्सव केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नसून, बैलगाडा शर्यत, कुस्ती आखाडा तसेच विविध सांस्कृतिक, धार्मिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांना मिळणार आहे. देवस्थान ट्रस्ट आणि उत्सव समितीकडून भाविकांच्या सोयीसाठी चोख व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

# चार आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी

**नारायणगाव (दै. संध्या)**

अवघ्या महाराष्ट्रात तमाशा पंढरी म्हणून ओळख असलेल्या नारायणगावातील विठाबाई नारायणगावकर तमाशा पंढरीच्या कलावंतांना लज्जा उत्पन्न होईल असे गैरवर्तन करून चार आरोपींनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. या तमाशा पंढरीचे फड मालक कैलास सावंत यांनी घारगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करून त्या चारही आरोपींना अटक करण्यात आली. नारायणगावच्या राष्ट्रपती पदक विजेत्या विठाबाई नारायणगावकर हे आपल्या तमाशा मंडळासह बुधवार दि. 1 रोजी माळेगाव पठार (ता. संगमनेर ) येथे तमाशाचा कार्यक्रम असल्याकारणाने फडातील 16 महिला, 44 पुरुषांसह चालक हे ट्रकने जात असताना वरुडी पठार शिवारातील पेट्रोल पंपाजवळ त्यांची गाडी 4 आरोपींनी अडवून गाडीला कट का मारला या कारणावरून तमाशा मंडळाच्या गाडीचा चालक प्रकाश औटी,विकास जठार यांच्यासह महिला व पुरुष कलावंतांना काठी व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.त्यानंतर बसमधील महिला कलावंतांच्या अंगावरील कपडे फाडून पोटावर छातीवर लाथा मारून लज्जा उत्पन्न होईल असे क्रूर कृत्य केले. बसच्या काचा देखील फोडण्यात आल्या. या प्रकरणी विठाबाई नारायणगावकर फड मालक कैलास मारुती सावंत यांनी घारगाव पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल करून सुमित गुंजाळ, संकेत बांगर, सोमेश बोंबले, आणि दत्तात्रय पडवळ या चार आरोपींना अटक करून न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# ओम साई व्दारकामाई पालखी सोहळा समितीच्या वतीने शिबिराचे आयोजन

**नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव (ता. जुन्नर) येथील मुक्ताई समाज मंदिरात ओम साई द्वारकामाई पायी पालखी सोहळा समितीच्या वतीने गुरुवार डी. 9/4/26 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात स्त्री रोग चिकित्सा, स्त्री रोग प्रसुती, थायरॉईड सर्जरी, हर्निया, फिशर, हृदयविकार तपासणी, पॅरालीसीस, डायबिटीस, मुळव्याध, सर्पदंश कावीळ, फिट झटके, पित्ताशयाचे विकार, पोटाचे विकार, जनरल सर्जरी, हाडाचे फॅक्चर, अपेन्डिस, संधिवात, व्हेरिकोज व्हेन्स, श्वासाचे आजार, स्त्री पिशवीच्या शस्त्रक्रिया, त्वचारोग, रक्त तपासण्या,(L.F.T. / R.F.T./ C.B.C.) B. P. ब्लड शुगर, ईसीजी, S.P.O.2 डोळे तपासणी, मोतीबिंदू, हृदयरोग,मुत्ररोग, अस्थीरोग, तपासणी व शस्त्रक्रिया, मुतखडा उपचार किडनी विकार सांधेदुखी स्तनाचे विकार पोटाचे विकार कॅन्सर तपासणी इत्यादींची मोफत तपासणी करण्यात येणार आहे. तसेच या शिबिरासाठी वाय सी.एम. हॉस्पिटल जुन्नर, हिंद लॅब डायग्नोस्टिक जुन्नर, मेडिकव्हर हॉस्पिटल संगमनेर, मते हॉस्पिटल नारायणगाव, ओम चैतन्य हॉस्पिटल आळेफाटा, शंकरा आय हॉस्पिटल पनवेल, डिसेंट फाउंडेशन पुणे, लायन्स क्लब जुन्नर,मुक्ताई काळोबा देवस्थान ट्रस्ट,ग्रामपंचायत नारायणगाव,ग्रामपंचायत वारुळवाडी यांचे सहकार्य लाभणार आहे.तरी जास्तीत जास्त रुग्णांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा अशी विनंती ओम साई “व्दारकामाई” पायी पालखी सोहळा समितीने केली आहे.

# अबॅकसच्या राष्ट्रीय स्पर्धेत आरोही कांडगे देशात प्रथम

**चाकण (दै. संध्या)**

आंतरराष्ट्रीय अबॅकस गणित महामंडळ, तैवान व भारत, सारा अबॅकस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या अबॅकसच्या अठराव्या राष्ट्रीय स्पर्धेत येथील आरोही किरण कांडगे हिचा देशात प्रथम क्रमांक आला.

भारत देशातून ५० विभागांमध्ये चार हजार पेक्षा जास्त विद्यार्थी राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. सारा अबॅकस अकॅडमी, चाकण येथून दुसऱ्या आणि अंतिम फेरीसाठी ४१ विद्यार्थ्यांची निवड झाली. त्यातून ३९ विद्यार्थी विजयी झाले. आरोही टी २ कॅटेगिरी मधून देशात प्रथम क्रमांकाने झळकली. तिने ८० गणिताची उदाहरणे अवघ्या पाच मिनिटांमध्ये सोडवून ३२० पैकी ३१५ गुण मिळवत देशात प्रथम क्रमांक पटकावला.




संस्थेच्या वतीने येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कौतुक सोहळ्यात कांडगे हिला सन्मानपत्र व गौरवचिन्ह देऊन गौरविण्यात आल्याची माहिती आंतरराष्ट्रीय अबॅकस गणित महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. अर्चना आघाव व डॉ. प्रवीण आघाव यांनी दिली.

आरोही ही चाकण येथील बांधकाम व्यवसायिक किरण प्रकाश कांडगे आणि शासकीय सेवेत असलेल्या रसिका किरण कांडगे यांची कन्या आहे. आई - वडिलांची साथ, चिकाटी, मेहनत, वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळे आरोही हिने हे उत्तुंग यश मिळवले. आरोही हिच्या या यशाबद्दल तिच्यावर सर्वच स्तरांतून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# हवेली तालुक्यात अवकाळी गारपिटीचा तडाखा

## शिंदवणे–वळती परिसरातील शेती उद्ध्वस्त, लाखोंचे नुकसान

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

हवेली तालुक्यातील शिंदवणे व वळती परिसरात बुधवार (ता. १ एप्रिल) सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे पालक, काकडी, कारले, वांगी, कलिंगड यांसारखी भाजीपाला पिके अक्षरशः जमीनदोस्त झाली आहेत. गारपिटीचा मारा इतका तीव्र होता की अनेक शेतांमध्ये गुडघ्याएवढे पाणी साचले होते. वांग्यासारख्या पिकाचे पाने राहिली नाहीत. पिके पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने आणि



गारांच्या मारामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून आणि मोठ्या खर्चाने पिके घेतली होती. मात्र या अवकाळी संकटामुळे त्यांच्या हातात काहीच उरले नाही. त्यामुळे शेतकरी हतबल झाले असून प्रशासनाकडे तातडीने मदतीची मागणी करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे त्वरित पंचनामे करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मोबदला देण्याची मागणी केली आहे. तसेच, अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशीही मागणी होत आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पुन्हा एकदा अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

> “मी तीन लाख रुपये खर्च करून तीन एकरमध्ये कलिंगड लागवड केली होती. पिक अगदी चार-पाच दिवसांत काढणीस तयार झाले होते. पण अचानक आलेल्या अवकाळी पावसासह झालेल्या जोरदार गारपीटीने संपूर्ण पिक भुईसपाट केले. वेलांचे अक्षरशः तुकडे झाले असून एकही कलिंगड विक्रीयोग्य राहिलेले नाही. काढणीच्या अगदी तोंडाशी आलेले पिक अशा प्रकारे नष्ट झाल्याने मोठा आर्थिक फटका बसला आहे. या नुकसानीचा अंदाज किमान सात ते आठ लाख रुपयांपर्यंत जातो. एवढा खर्च करूनही हातात काहीच न उरल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.”
> — **अनिल विलास कुंजीर, शिंदवणे (नुकसानग्रस्त शेतकरी)**

> “उन्हाळ्यात पाण्याचा प्रचंड तुटवडा असतानाही शेतकरी ठिबक-ठिबक पाणी साठवून पाल्या भाज्यांचे पीक घेत असतो. दिवस-रात्र मेहनत करून पिके उभी केली जातात. मात्र निसर्गाच्या या लहरीपणामुळे एका क्षणात सर्व काही उद्ध्वस्त होत आहे. काढणीच्या तोंडाशी आलेला पालक गारपीटीमुळे पूर्णपणे जमिनीवर पडला. त्यामुळे आमच्या मेहनतीवर पाणी फिरले असून आर्थिक तसेच मानसिक मोठा धक्का बसला आहे. अशा संकटात शासनाकडून तातडीने मदत मिळणे अत्यंत गरजेचे आहे.”
> — **तात्यासो माणिक घोलप, वळती (नुकसानग्रस्त)**